
www.rajdand.com
पुणे, बुधवार
01.03.2023
पृष्ठ : ४ । मूल्य : ₹ ४.०० । फाल्गुन शु.१०
/rajdandlive
Declaration No. : SDM/SR/07/2023

मराठी माणसाचा मानदंड
# राजदंड
स्थापना १९९९



**संयुक्त राष्ट्रांच्या बैठकीत 'कैलासा'ची एंट्री : फरार झालेल्या स्वामी नित्यानंदाने स्थापन केला देश**

पान ४ वर..

# भाजपाचा कसब्याचा बालेकिल्ला ढासळणार?

## स्ट्रेलिमा आणि रिंग साईड रिसर्चच्या 'एक्झिट पोल'चा निष्कर्ष



**पुणे : प्रतिनिधी**

**कसबा आणि चिंचवड विधानसभा मतदारसंघाच्या पोटनिवडणुकीसाठी झालेल्या मतदानानंतर दोन संस्थांचे एक्झिट पोलने व्यक्त केलेले अंदाज धक्कादायक ठरतील असे आहेत. या अंदाजानुसार भारतीय जनता पक्षाचा बालेकिल्ला असलेल्या कसबा पेठ मतदारसंघात पक्षाला पराभवाला सामोरे जावे लागेल तर चिंचवडचा गड अश्विनी जगताप राखतील.**

कसबा पेठ मतदारसंघात महाविकास आघाडीचे उमेदवार रवींद्र धंगेकर यांनी भाजपचे उमेदवार हेमंत रासने यांच्यासमोर कडवे आव्हान उभे केले होते. दोन संस्थांनी केलेल्या मतदानोत्तर चाचणीत रासने हे धंगेकर यांच्याकडून सुमारे पंधरा हजार मतांनी पराभूत होतील असा अंदाज वर्तविला आहे.

चिंचवडच्या निवडणुकीत महाविकास आघाडीकडून नाना काटे यांना उमेदवारी देण्यात आली. शिवसेनेचे राहुल कलाटे बंडखोरी करून अपक्ष म्हणून मैदानात उतरले. त्यामुळे सहानुभूतीबरोबरच महाविकास आघाडीच्या मतदानात विभागणी होऊन त्याचा फायदा अश्विनी जगताप यांना मिळेल, असेही अंदाजावरून दिसून येत आहे. चिंचवड मध्ये ३० हजारपेक्षा अधिक मतांनी अश्विनी जगताप यांनी निवडून येतील, असे हे अंदाज दर्शवितात.

# राज्यसरकार सीमावर्ती बांधवांच्या पाठीशी

## ▪ मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची ग्वाही



**मुंबई : प्रतिनिधी**

महाराष्ट्र आणि कर्नाटकाच्या सीमावर्ती भागात राहणाऱ्या मराठी बांधवांच्या पाठीशी राज्य सरकार ठामपणे उभे असल्याची ग्वाही मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिली. छगन भुजबळ यांनी विधानसभेत उपस्थित केलेल्या मुद्यावर बोलताना मुख्यमंत्री शिंदे यांनी ही ग्वाही दिली.

महाराष्ट्र आणि कर्नाटकचा सीमावाद सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित आहे. न्यायालयात सरकारची बाजू प्रभावीपणे मांडण्यासाठी तज्ज्ञ वकिलांची नियुक्ती करण्यात आली आहे. त्याचप्रमाणे ज्येष्ठविधीज्ञ हरी साळवे यांना न्यायालयात महाराष्ट्राची बाजू मांडण्यासाठी विनंती करण्यात आली असून त्यांच्याकडूनही सकारात्मक प्रतिसाद मिळाला आहे, अशी माहिती मुख्यमंत्र्यांनी विधानसभेत दिली.

काही काळापूर्वी सीमावासियांवर अन्याय होऊ नये यासाठी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्याकडे दोन्ही राज्यांच्या मुख्यमंत्र्यांची बैठक घेतली गेली. त्यांनी या समस्येकडे जातीने लक्ष घालण्याचे मान्य केले आहे. महाराष्ट्र आणि कर्नाटक या राज्यांमध्ये असलेल्या विविध वादांच्या मुद्द्यावर मार्ग काढण्यासाठी दोन्ही राज्यांच्या तीन-तीन मंत्र्यांची समिती नियुक्त केली जावी, अशी सूचना गृहमंत्र्यांनी केली होती. त्यानुसार या समितीतील मंत्र्यांची निवड करण्यात आली असून लवकरच त्यांची बैठक आयोजित करण्यात येईल, असेही शिंदे यांनी सांगितले.

केंद्र सरकारकडून कर्नाटकवर दबाव आणून सीमा वासियांवर दाखल करण्यात आलेले गुन्हे मागे घेण्यात यावे यासाठी ही प्रयत्न केला जाईल, असेही मुख्यमंत्री म्हणाले.

### अपघातात दोघांना जखमी केल्याप्रकरणी कार चालकावर गुन्हा

**सातारा :** अपघातात दोघांना जखमी केल्याप्रकरणी कार चालकावर सातारा शहर पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी, दि. १९ फेब्रुवारी रोजी रात्री आठ वाजण्याच्या सुमारास शाहू चौक ते बोगदा जाणाऱ्या रस्त्यावर असणाऱ्या गुरुवार बाग येथील पाण्याच्या टाकीजवळ रमेश गोपाळ देशमुख राहणार जकातवाडी, ता. सातारा यांच्या दुचाकीस समोरून येणाऱ्या कार क्रमांक एमएच १४ एफएस ४६१३ वरील चालक विकास जाधव रा. क्षेत्र माहुली, सातारा याने समोरासमोर जोराची धडक दिली. त्यामुळे रमेश देशमुख आणि त्यांचा मित्र विक्रम नारायण सणस हे दोघेजण जखमी झाले. याप्रकरणी कारचालकावर सातारा शहर पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदविण्यात आला असून अधिक तपास पोलीस हवालदार कारळे करीत आहेत.

# महागाई आणि दहशतवादामुळे पाकिस्तान विनाशाच्या उंबरठ्यावर

## अमेरिकेच्या शासकीय संस्थेचा अहवाल



**वॉशिंग्टन : वृत्तसंस्था**

पाकिस्तान भीषण महागाई आणि आर्थिक संकट याला तोंड देत असतानाच दहशतवादी हल्ले मोठ्या प्रमाणावर वाढत असल्याबद्दल अमेरिकेने चिंता व्यक्त केली आहे. दहशतवादाला ना घातल्यास पाकिस्तान चा विनाश अटळ आहे अशी टिपणी यूएस ब्युरो ऑफ काउंटर टेररिझमने आपल्या अहवालात केली आहे.

सन २०२० पेक्षा २०२१ मध्ये पाकिस्तानातील दहशतवादी हल्ल्यांचे प्रमाण वाढले आहे. विशेषतः सिंध आणि बलुचिस्तान या दोन प्रांतात सर्वाधिक दहशतवादी हल्ले झाले आहेत. पाकिस्तानात तरीके तालिबान पाकिस्तान, बलुचिस्तान लिबरेशन आर्मी आणि इसिस या दहशतवादी संघटना कार्यरत आहेत.

पाकिस्तानात दहशतवादाला प्रोत्साहन दिले जाते. दहशतवादासाठी पाकिस्तानची भूमी सुरक्षित आहे. पाकिस्तानी राज्यकर्ते मोठ्या वर्गांना करीत असले तरीही प्रत्यक्षात पाकिस्तानात दहशतवाद्यांच्या विरोधात कठोर कारवाई केली जात नाही. त्यामुळे अमेरिकेसह अनेक देशांनी पाकिस्तानवर काही निर्बंध देखील लादले आहेत. ब्युरो ऑफ काउंटर टेररिझम च्या अहवालात नमूद केल्यानुसार दहशतवादाला वेळीच आळा घालण्यात पाकिस्तानला यश आले नाही तर पाकिस्तानचा विनाश अटळ आहे.

# कुख्यात दहशतवादी सर्फराज मेमन जेरबंद

## महाराष्ट्र एटीएसटी इंदोरमध्ये कारवाई



**मुंबई : प्रतिनिधी**

दहशतवादी हल्ल्याच्या तयारीत असण्याचा संशय असलेला कुख्यात दहशतवादी सरफराज मेमन याला महाराष्ट्र पोलिसांच्या दहशतवाद विरोधी पथकाने इंदोर येथून ताब्यात घेतले आहे. राष्ट्रीय तपास यंत्रणेच्या सूचनेनुसार ही कारवाई करण्यात आली.

चीन पाकिस्तान आणि हाँगकाँग या देशांमध्ये दहशतवादी कारवायांचे प्रशिक्षण घेऊन आलेला सर्फराज देशासाठी धोकादायक व्यक्ती असून तो मुंबईत येण्याच्या प्रयत्नात असल्याचे राष्ट्रीय सुरक्षा यंत्रणे कडून महाराष्ट्र एटीएस ला सांगण्यात आले.

मेमनची ओळख पटावी म्हणून त्याचा व्हिसा, वाहन परवाना, पारपत्र आणि आधार कार्ड यांच्या प्रतिही एनआयएकडून महाराष्ट्र पोलिसांना देण्यात आल्या. मेमन हा इंदोर येथील रहिवासी असल्याने मध्यप्रदेश पोलिसांनाही त्याच्याबद्दल माहिती देण्यात आली. महाराष्ट्र एटीएसच्या पथकाने इंदोर येथे जाऊन त्याला ताब्यात घेतले आहे.

### गळफास घेऊन एकाची आत्महत्या

सातारा : गळफास घेऊन एकाने आत्महत्या केल्याची नोंद सातारा शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी, दिनांक २७ फेब्रुवारी रोजी संध्याकाळी पावणेसात वाजण्याच्यापूर्वी निखिल नंदकुमार पाटील वय २५ राहणार संगमनगर, सातारा याने राहत्या घरातील जिन्यातील खिडकीला ओढणीने गळफास घेऊन आत्महत्या केली आहे. अधिक तपास पोलीस नाईक भिसे करीत आहेत.

# देशाला इतिहासात अडकवू नका - सर्वोच्च न्यायालयाची स्पष्टोक्ती

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

इतिहासाचा कोणताही भाग सोयीस्कर रित्या पुनरुजीवीत करून तो वर्तमान आणि भावी पिढी यांच्यावर लादता येणार नाही. संकुचित कारणासाठी देशाला इतिहासात अडकवू नका, अशी स्पष्टोक्ती सर्वोच्च न्यायालयाने केली.

भारतीय जनता पक्षाचे नेते अश्विनी उपाध्याय यांनी ऐतिहासिक स्थळांचे नामांतरण करण्यासाठी स्वतंत्र आयोग स्थापन करावा. त्यासाठी सर्वोच्च न्यायालयाने केंद्र सरकारला आदेश द्यावे, अशी मागणी करणारी याचिका दाखल केली होती. न्यायालयाने कठोर भाष्य करून ही याचिका फेटाळून लावली.



भारतावर अनेकदा आक्रमणे झाली. अनेक आक्रमकानी कित्येक वर्ष राज्यही केले. मात्र, इतिहासाचा तेवढाच भाग उगाळून ऐतिहासिक ठिकाणांची आक्रमकानी बदललेली नावे पुन्हा उजळण्याचे उद्योग करण्यात काहीच अर्थ नाही. त्यापेक्षा अधिक महत्त्वाच्या अनेक गोष्टी आणि समस्या देशासमोर आहेत, अशा शब्दात न्या. के एम जोसेफ आणि न्या. बी व्ही नागरत्न यांनी याचिकाकर्त्यांची खरडपट्टी काढली.

हिंदू धर्म जीवनपद्धती आहे. हिंदू संस्कृतीने अनेकांना आपल्यात सामावून घेतले आहे. त्यामुळे धर्माचा वापर करून संकुचित गोष्टींना प्रोत्साहन देऊ नका, असेही न्यायालयाने नमूद केले.

# टेम्पो चालकाचा मुलगा होणार डीवायएसपी, सांगलीचा प्रमोद चौगुले एमपीएससी परीक्षेत पुन्हा एकदा टॉपर

**सांगली : प्रतिनिधी**

राज्यसेवा २०२१ ची गुणवत्ता यादी जाहीर झाली असून सांगलीचा प्रमोद चौगुले हा राज्यात पहिला आला आहे. सलग दुसऱ्यांदा राज्यात पहिला येण्याच्या बहुमान प्रमोद चौगुले याने मिळवला आहे. सध्या प्रमोद चौगुले नाशिक येथे उद्योग उपसंचालक या पदावर कार्यरत आहेत. आता प्रमोद चौगुले खाकी वेशात दिसणार असून डीवायएसपी होण्याचं त्याचं स्वप्न पूर्ण होणार आहे.

मिरज तालुक्यातील सोनी हे प्रमोद चौगुले यांचे मूळ गाव.पण गेल्या सात वर्षांपासून कामाच्या निमित्ताने चौगुले कुटुंब सांगलीत स्थायिक आहे. प्रमोद चौगुले यांचं शिक्षण पलूस येथील नवोदय विद्यामंदिर आणि त्यानंतर महाविद्यालयीन शिक्षण व वालचंद कॉलेजमधून झाले,आई-वडिलांचं ध्येय एकच होते. मुलांनी शिक्षण घ्यावं म्हणून प्रमोदच्या आई-वडिलांनी कधी त्यांना कोणत्याही गोष्टीची कमी पडू दिली नाही.



प्रमोदचे वडील टेम्पो चालक आणि आईने शिवणकाम करून संसाराचा गाडा चालवला. २०२० मध्ये प्रमोद चौगुले याने एमपीएससीमध्ये पहिला येण्याचा बहुमान मिळाला होता आणि त्यानंतर त्याची उद्योग विभागात उपसंचालक म्हणून नियुक्ती झाली होती. त्याची नाशिक या ठिकाणी प्रशिक्षण सुरू आहे. मात्र त्याला पोलिस विभागात जायचं होतं, त्यामुळे त्यांनी २०२१ मध्ये पुन्हा एमपीएससीची परीक्षा दिली. त्या परीक्षेचा निकाल आज लागला असून त्यामध्ये प्रमोद चौगुलेने पुन्हा राज्यात पाहिला येण्याचा मान पटकावला. आता त्याची डीवायएसपी म्हणून निवड होणार आहे.

**एमपीएससीची गुणवत्ता यादी जाहीर**

राज्यसेवा २०२१ सालची सर्वसाधारण गुणवत्ता यादी जाहीर झाली असून सांगलीचा प्रमोद चौगुले सलग दुसऱ्यांदा राज्यात पहिला आला आहे. तर दुसऱ्या क्रमांकावर शुभम पाटीलने बाजी मारली आहे. तर मुलींमध्ये सोनाली म्हात्रे हिने पहिला क्रमांक पटकवला असून एकूणात ती राज्यात तिसरी आली आहे. प्रमोद चौगुले हा सध्या उद्योग आणि उपसंचालक या पदावर नाशिक येथे कार्यरत आहे. गेल्या वर्षीही तो राज्यात पाहिला आला होता.

### शेळ्यांच्या मृत्यूप्रकरणी तिघांवर गुन्हा

**सातारा :** शेळ्यांच्या मृत्यूप्रकरणी तिघांवर वाठार पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी, दि. २४ फेब्रुवारी रोजी पावणेदहा वाजण्याच्यापूर्वी राजेंद्र संभाजी जाधव, मनोज संभाजी जाधव, महेश मोरे (पूर्ण नाव माहित नाही) सर्व रा. वाघोली, ता. कोरेगाव यांनी तेथीलच संतोष अंकुशराव भोईटे यांच्या २४ हजार रुपये किंमतीच्या तीन शेळ्यांना काहीतरी विषारी औषध खायला घालून त्यांना मारून भोईटे यांचे नुकसान केले. याप्रकरणी वाठार पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

# कराड-सातारा-पुणे शटल सेवा सुरू करावी

## सातारा रेल्वेस्थानक इमारत उद्घाटन प्रसंगी खा. उदयनराजे यांची मागणी



**सातारा : प्रतिनिधी**

रोजगार व शिक्षण, व्यापार या तीन उदिष्टांसह विद्यार्थ्यांच्या सोयीसाठी कराड सातारा पुणे अशी रेल्वे शटल सेवा सुरू करण्यात यावी . शिवाय पुणे जंक्शनवर रेल्वे वाहतुकीचा प्रचंड ताण आहे . त्यासाठी काही मार्ग साताऱ्याकडे वळविल्यास त्याचा फायदा सातारा जिल्ह्याला होईल अशी अपेक्षा खासदार उदयनराजे भोसले यांनी व्यक्त केली .

ससातारा रेल्वे स्थानकाच्या नवीन इमारतीचे उदघाटन खासदार श्रीनिवास पाटील, उदयनराजे भोसले यांच्या हस्ते झाले. यावेळी रेल्वेच्या पुणे विभागाच्या व्यवस्थापिका श्रीमती इंदू दुबे, वरिष्ठ वाणिज्य व्यवस्थापक डॉ. मिलिंद हिरवे, सुनिल काटकर, ॲड. विनित पाटील, दादा चव्हाण, संतोष जाधव, मिलिंद चव्हाण, सतीश चव्हाण, तसेच रेल्वेचे अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

उदयनराजे म्हणाले, सातारा राजधानीला शोभेल असे रेल्वे स्टेशन व्हावे, यासाठी आम्ही तत्कालिन रेल्वे मंत्री सुरेश प्रभु यांच्याकडे पाठपुरावा केला होता. रेल्वे स्टेशनवर असुविधा होत्या. त्यातूनच आज सुंदर अशा ऐतिहासिक इमारतीची उभारणी झाली आहे. रेल्वे मार्गाचे इलेक्ट्रीफिकेशन, दुपदरीकरण, माल साठवणीसाठी जागा, आदी सुविधाही उपलब्ध झाल्या आहेत. मात्र पुणे जंक्शनवर दळणवळण व रेल्वे लाईनचा ताणं आहे काही मार्ग सातारा जिल्ह्यातून नेल्यास रोजगार व दळणवळण याचा निश्चित फायदा होईल . पुणे येथे शिकावयाला जाणारे विद्यार्थी चाकरमानी यांच्यासाठी कराड सातारा पुणे शटल सेवा सुरू करावी अशी मागणी त्यांनी केली .श्रीनिवास पाटील म्हणाले, सातारा जिल्ह्यातील रेल्वेच्या संदर्भातील सर्व प्रश्न आपण सर्वांनी एकत्रितपणे सोडविणे गरजेचे आहे. त्यासाठी पक्षविरहित कामाला प्राधान्य देऊ. प्रवाशांना जास्तीत जास्त चांगल्या सुविधा देण्यासोबतच रेल्वेच्या नवीन ऐतिहासिक इमारतीत स्वच्छतेला प्राधान्य दिले जावे. जेणे करुन बाहेरुन आलेल्या प्रवाशांना आपण राजधानीत आल्यासारखे वाटेल.

### एकावर कुऱ्हाडीने वार केल्या प्रकरणी एकावर गुन्हा दाखल

**सातारा : प्रतिनिधी**

एकावर कुऱ्हाडीने वार केल्या प्रकरणी एकावर सातारा शहर पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी, दि. २६ फेब्रुवारी रोजी रात्री सव्वा अकरा वाजण्याच्या सुमारास अरविंद किराणा स्टोअर्स समोर प्रतापसिंह नगर सातारा येथील रस्त्यावर दारू पिण्यासाठी पैसे मागितल्याच्या कारणावरून रोहित भोसले राहणार प्रतापसिंह नगर सातारा याने कुऱ्हाडीने तेथीलच मारुती दत्ता जाधव यांच्या पाठीत वार करून आणि जाधव यांच्या मेव्हण्याला शिवीगाळ करून दमदाटी केली.

याप्रकरणी भोसले याच्यावर सातारा शहर पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला असून अधिक तपास पोलीस नाईक दळवी करीत आहेत.


# फेब्रुवारीतच उष्णतेची लाट, १२२ वर्षांचा विक्रम मोडला

### सरासरी तापमान २९.५ डिग्री

**नवी दिल्ली : प्रतिनिधी**

२०२३ या वर्षाची सुरुवातच कडाक्याच्या थंडीने झाली होती. जानेवारी महिन्यात आलेल्या थंडीमुळे अनेक वर्षांचा विक्रम मोडीत निघाला होता. यंदा जास्त दिवस थंडीचे वातावरण राहिल असे वाटत होतं. पण असे झाले नाही. जानेवारी संपता संपता उत्तर भारतामध्ये तापमानात वाढ व्हायला सुरुवात झाली होती. त्यानंतर फेब्रुवारी महिन्यातील उष्णतेच्या लाटेनं सर्व विक्रम मोडीत काढले. फेब्रुवारी महिन्यात उष्णतेची लाट आली होती. फेब्रुवारी महिन्यातील तापमानाने १२२ वर्षांचा विक्रम मोडीत काढला आहे. फेब्रुवारी महिन्यात सरासरी २९.५ डिग्री तापमान राहिले आहे. १९०१ नंतर इतके तापमान पहिल्यांदाच राहिलेय.

यंदाचा उन्हाळाची तीव्रता जास्त राहण्याची शक्यता आहे. त्यामुळे महाराष्ट्रात अंगाची लाहीलाही होऊ शकते. राज्यातील तापमान सरासरीपेक्षा अधिक राहण्याचा अंदाज भारतीय हवामान विभागाने वर्तवला आहे. मार्च ते मे महिन्यादरम्यान महाराष्ट्रात अनेक ठिकाणी उष्णतेच्या लाटेची शक्यता आहे. उत्तर कोकणात देखील मार्च ते मे महिन्यादरम्यान उष्णतेच्या लाटेचा अनुभव येणार, तापमान ४० अंशांपार जाण्याची शक्यता आहे. मार्च महिन्यात उत्तर महाराष्ट्र, पश्चिम विदर्भ आणि मराठवाड्यात काही ठिकाणी उष्णतेच्या लाटेचा अंदाज वर्तवला आहे. पण याची तीव्रता कमी असणार असे हवामान विभागाने सांगितलेय.



हवामान विभागाच्या आकडेवारीनुसार, फेब्रुवारी महिन्यातील सरासरी तापमान वाढून २९.५ डिग्री इतके राहिलेय. जे १९०१ नंतर सर्वोत्तम आहे. फक्त दिल्लीबाबत बोलायचं झाल्यास, फेब्रुवारी महिन्यात आतापर्यंतची सर्वात अधिक तापमानाची नोंद झाली आहे. ऋतू बदलतोय, आपण थंडीतून उन्हाळ्यात प्रवेश करतोय, काही काळाने हे लागणारे चटके कमी होतील आणि पुन्हा मार्च एप्रिलमध्ये आपल्याला उन्हाळा वाढल्याचे जाणवेल पण सध्याचे ऊन हे आरोग्यासाठी हानिकारक आहे. १९५१ ते २०२३ पर्यंत सरासरी तापमान कसे राहिलेय पाहू...

मार्च महिन्यात देशातील अनेक भागातील तापमानात वाढ होण्याची शक्यता आहे. यामध्ये ईशान्य भारतासह मध्य भारत आणि उत्तर भारताचाही समावेश आहे. त्यामुळे केंद्रीय आरोग्य मंत्रालयाने मार्गदर्शक सूचना (ॲडवायजरी) जारी केल्या आहेत. उच्च प्रथिनेयुक्त पदार्थ आणि अति उष्णता असल्यानंतर जेवण तयार करु नका... विशेष करुन दुपारी १२ ते दुपारी तीन या दरम्यान घराबाहेर उन्हात जाऊ नका... त्याशिवाय तहान न लागली तरीही पाणी प्या... असे मार्गदर्शक सूचनामध्ये सांगण्यात आलेय.

**काय करावे ?**

ओरल रिहायड्रेशन सॉल्यूशन (ओआरएस) याचा वापर करा... त्याशिवाय घरात तयार केलेले लिंबू-पाणी, छास, लस्सी, ज्यूस याचं जास्तीत जास्त सेवन करा.. घरातून दुपारच्या वेळी बाहेर येऊ नका..टरबूज, कलिंगड, संत्रा यासारख्या फळांचं सेवन करा. तसेच सुती कपडे परिधान करा.. गडद रंगाचे कपडे परिधान करु नका.. उन्हात जाताना डोकं झाका...

## भिवराबाई सावंत अभियांत्रिकीमधील टेकनोव्हिजन व शोध स्पर्धेत ८०० विद्यार्थ्यांचा सहभाग



नऱ्हे येथील भिवराबाई सावंत आभियांत्रिकी महाविद्यालयात आजपासून सुरू झालेल्या टेकनोव्हिजन व शोध या स्पर्धेत सादर करण्यात आलेल्या प्रकल्पांची पाहणी करताना मान्यवर.

**पुणे : प्रतिनिधी**

नऱ्हे येथील जेएसपीएम व टीएसएसएम ग्रुपच्या भिवराबाई सावंत आभियांत्रिकी महाविद्यालयात आजपासून सुरू झालेल्या टेकनोव्हिजन व शोध या स्पर्धेत राज्यभरातील विविध महाविद्यालयातील ८०० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला असून २०० प्रकल्प सादर करण्यात आले आहेत.ग्रीन एनर्जी ते सुरक्षा व्यवस्था अशा अनेक विषयांवरील हे प्रकल्प असून ते पाहण्यासाठी विद्यार्थ्यांनी मोठी गर्दी केली आहे.

या स्पर्धेचे उद्घाटन डायमेंशन मेकॅनिकस कंपनीचे व्यवस्थापकीय संचालक विश्वजीत गोखले यांच्या हस्ते आणि जेएसपीएम संस्थेचे विश्वस्त ऋषिराज सावंत यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आले.यावेळी श्री गोखले यांनी अशा स्पर्धेत सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांनी उद्योजक बनण्याचा प्रयत्न करावा असे आवाहन केले. प्रारंभी प्राचार्य डॉ गणेश हिंगे यांनी प्रास्ताविक केले तर पदविका विभागाचे प्राचार्य डॉ एस एस कांदे यांनी आभार मानले.स्पर्धेचे समन्वयक डॉ मनोज दळवी,डॉ प्रताप शिंदे यांनी स्पर्धेबाबतची माहिती दिली.यावेळी प्राचार्य डॉ सुमंत चौधरी यांच्यासह विभाग प्रमुख,स्पर्धेचे जज्ज उपस्थित होते.सूत्र संचालन पल्लवी फरांदे,प्रियांका नाईक यांनी केले.

## निमगाव येथे सुप्रसिद्ध कुस्ती निवेदक युवराज केचे यांना 'छत्रपती पुरस्कार' प्रदान

**अकलूज : प्रतिनिधी**

बहुजन प्रतिपालक, कुळवाडी भूषण छ. शिवाजी महाराज यांच्या ३९३ व्या जयंतीनिमित्त निमगाव ता माळशिरस येथे राजे प्रतिष्ठान व पवार तालीम चे वस्ताद गोरख पवार यांच्या मार्गदर्शनाखाली रविवार दि २६ फेब्रुवारी रोजी निकाली कुस्त्यांचे जंगी मैदान आयोजित करण्यात आले होते या मैदानात गारा अकोले ता माढा येथील महाराष्ट्रभर ख्याती असलेले सुप्रसिद्ध कुस्ती समालोचक युवराज केचे यांना चांदीची गदा, शाल ,फेटा व पुष्पहार देऊन छत्रपती पुरस्काराने गौरविण्यात आले.



कुस्ती समालोचक युवराज केचे यांना छत्रपती पुरस्कार प्रदान करताना महाराष्ट्र केसरी रावसाहेब मगर, गोरख पवार ,दादा पवार, विजय पवार, दादा पवार, किसन पवार आदी मान्यवर.

यावेळी पवार तालमीचे वस्ताद गोरख पवार, महाराष्ट्र केसरी छोटा रावसाहेब मगर, विजय पवार ,किसन पवार, दादा पवार,निनाद पाटील, नितीन मगर, मातोश्री इंडस्ट्रीजचे नागनाथ मगर, युवा सेना विस्तारक उत्तम अहिवळे , युवा सेनेचे राज्यसचिव स्वप्निल वाघमारे, राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हा उपाध्यक्ष अंबादास ओरसे, युवा सेनेचे माळशिरस तालुका अध्यक्ष सुभाष काकडे , राष्ट्रवादीचे नेते अशोक गायकवाड, तुकाराम साळुंखे, राहुल ढेरे ,निमगाव ग्रामपंचायतीचे सदस्य किरण पाटील, प्रताप मगर, सुनील मगर ,सत्यवान बोडरे, आबासाहेब सावंत यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

युवराज केचे यांनी संपूर्ण महाराष्ट्रभर जवळपास एक हजारांपेक्षा जास्त मैदानावर कुस्ती समालोचक म्हणून काम केले असून मुंबई महापौर केसरी पुणे महापौर केसरी मीरा-भाईंदर महापूर केसरी परभणी नागपूर आदी ठिकाणी त्यांनी उत्तम कुस्ती निवेदक म्हणून काम पाहिलेले आहे ते स्वतः एक पहिलवान असून वयाच्या विसाव्या वर्षापासून कुस्ती समालोचक म्हणून ते काम पाहत आहेत पदवीधर असलेले युवराज केचे यांनी आपले चुलते प्रल्हाद केचे यांच्याकडून कुस्तीची प्रेरणा घेऊन कुस्ती समालोचक म्हणून काम केलेली आहे या कामाची दखल घेऊन त्यांना प्रथमच राजे प्रतिष्ठान व पवार तालीम यांच्या वतीने 'छत्रपती पुरस्कार' देण्यात आलेला आहे.

**पैलवानांचं गाव म्हणून संपूर्ण महाराष्ट्रभर परिचित असणाऱ्या निमगावमध्ये मला उत्तम कुस्ती समालोचक म्हणून छत्रपती पुरस्काराने प्रथमच गौरविण्यात आले असून बापूसाहेब राडे यांनी सन १९८५ – ८६ च्या दरम्यान कुस्ती मैदानावर सुरू केलेली कुस्ती समालोचनाची पद्धत शंकर पुजारी यांच्या बरोबर राजाभाऊ देवकाते, बाबा निम्हन, धनाजी मदने, सुरेश जाधव, प्रशांत भागवत यांच्या समवेत पुढे नेऊन कुस्ती या मर्दानी खेळाला पुन्हा एकदा समालोचनाच्या माध्यमातून गत वैभव देण्याचा प्रयत्न राहील.**

**– युवराज केचे,**
**छत्रपती पुरस्कारप्राप्त**
**कुस्ती समालोचक**

## 'मी कुठे म्हणालो मला अढळपद दे गगनातले'

### वैभव जोशी यांच्या गझल अंदाजची सातारकरांना भुरळ

**सातारा : प्रतिनिधी**

एक पेग म्हणता म्हणता दोन-चार झाले, मी कुठे म्हणतो मला अढळपद दे गगनातले, तुला भेटून जाताना जसा व्याकुळ होतो ओंडका अशा आशय घन आणि प्रवाही गझलांनी सातारकरांची सोमवारची संध्याकाळ रंगली. मराठी भाषा प्रवाही आणि लवचिक आहे ती सशक्त आहे म्हणूनच प्रगल्भ वाड्मय निर्मिती यामध्ये होत असते अशा आशयपूर्ण मांडणीनंतर गझलकार व ज्येष्ठ कवी वैभव जोशी यांनी सातारकरांना आपल्या काव्यप्रतिभेची झलक दाखवली

मराठी राजभाषा दिनानिमित्त शाहूपुरी शाखा सातारा आणि सातारा नगरपालिका यांच्या संयुक्त विद्यमाने ज्येष्ठ कवी वैभव जोशी यांच्या प्रकट मुलाखतीसह गजल आणि कविता सादरीकरणाचा कार्यक्रम शाहू कलामंदिर येथे आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमाला सातारकरांनी भरभरून प्रतिसाद दिला या प्रतिसादाला दाद देताना वैभव जोशी म्हणाले रसिक मायबाप जोपर्यंत अशा कार्यक्रमांना आशीर्वाद देत आहेत तोपर्यंत मराठी भाषेचे भविष्य उज्वल राहणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

मराठी भाषा पंधरवडा निमित्त आयोजित विविध कार्यक्रमांचे सुरुवात वैभव जोशी यांच्या गझल सादरीकरणाने झाली. कार्यक्रमाचे उद्घाटन माजी उपनगराध्यक्ष मनोज शेंडे, किशोर शिंदे, महाराष्ट्र साहित्य परिषद शाहूपुरी शाखेचे अध्यक्ष विनोद कुलकर्णी, पटकथा लेखक निलेश महिगावकर इत्यादी मान्यवर यावेळी उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात दीप प्रज्वलनाने झाली प्रास्ताविक करताना विनोद कुलकर्णी म्हणाले मराठी भाषा अभिजात बनवण्याचा लढा अविरतपणे सुरू आहे. आजच्या साहित्यिकांनी व्यवस्थेला परखड प्रश्न विचारणारी साहित्य निर्मिती करायला हवी त्यातूनच मराठी भाषेचा पुढील प्रवास हा अभिजात तेच्या दृष्टीने होणार आहे. त्यानंतर वैभव जोशी यांचा गझल प्रवास निलेश माहेगावकर आणि विनोद कुलकर्णी यांनी मोजक्या प्रश्नांमधून उलगडला.

वैभव जोशी म्हणाले मी सोलापूर मधील मध्यमवर्गीय कुटुंबातला होतो. कौटुंबिक पार्श्वभूमी सांस्कृतिक जरी नसली तरी वडिलांचे वाचन अफाट होते संगमेश्वर येथे महाविद्यालयात ॲडमिशन घेतल्यानंतर कविता व्यासंगाची सुरुवात झाली मनात एक अस्वस्थता होती त्यामुळे माझ्यातला अभियंता आणि माझ्यातला कवी यांच्यातला दुहेरी संघर्ष मी अनुभवत होतो म्हणूनच कविता जन्माला येऊ लागल्या. ह्या प्रवासादरम्यान त्यांनी एक पेग म्हणता म्हणता दोन चार झाले, सशासारखे जीणे बाणेदार झाले, तुला भेटून जाताना जसा व्याकुळ होतो ओंडका वाहून जाताना तसे काहीतरी होते तुला सोडून जाताना, काल रात्री पाऊस खिडकीच्या अगदीच अंगचटीला आला, आयुष्याला धावण्याचा स्वभाव नाही आई तुझ्याविना जगण्याचा सराव नाही आई मी कुठे म्हणालो मला दे अढळपद गगनातले, माणसाच्या काळजात स्थान दे रे इश्वरा अशा एकापेक्षा एक अशा आशयघन गझलांना सातारकरांनी टाळ्यांच्या कडकडाटात प्रतिसाद दिला. कवी अभिव्यक्तीत आजकाल कमी पडतात का? कविता व्यावसायिक होते आहे का? आयुष्यातले चकवे व वणवे आणि मराठी भाषेची आगामी वाटचाल या विविध विषयांवर जोशी सहजपणे व्यक्त झाले ते म्हणाले प्रत्येक व्यक्तीला अभिव्यक्त होण्याचे शंभर टक्के स्वातंत्र्य आहे. तसेच कविता व्यावसायिक तिकडे बघण्याचा पूर्वग्रह दूषित आहे जास्तीत जास्त मराठी कविता रसिकांपर्यंत पोहोचायला हव्यात. कधी संगमेश्वर कॉलेजला गेलो नाही पण त्यादरम्यान वाचनालयात जाऊन लागलेले वाचनाची गोडी यामधूनच माझी कविता समृद्ध होत गेली. मराठी साहित्याला प्रिय मांनणाऱ्या साहित्यिक रसिकांनीच मराठी कवितेला आणि भाषेला पुढे नेले आहे त्यामुळे मराठी भाषेच्या दर्जा विषयी अजिबात काळजी करण्याची गरज नाही असे ते स्पष्टपणे म्हणाले.

## टेम्पो-दुचाकी अपघातात एक ठार, एक जखमी

**लोणंद :** लोणंद -सातारा रोडवर विश्रामगृहाजवळ एका अज्ञात टेम्पोने दुचाकीस जोराची धडक दिली. या अपघातात दुचाकीस्वाराचा जागीच मृत्यू तर, एक जण किरकोळ जखमी झाला.

दत्तात्रय किसन जाधव (वय ५०) असे मृताचे नाव आहे. तर सतिश लक्ष्मण लकडे (४०, दोघेही रा. निंबुत छपरी ता. बारामती जि. पुणे) असे जखमीचे नाव आहे. ही घटना आज, सोमवारी (दि.२७) दुपारच्या दरम्यान घडली.

याबाबत माहिती अशी की, मृत दत्तात्रय जाधव व त्यांचा मित्र सतिश लकडे हे लोणंद-सातारा रोडवरुन निरा बाजूकडे निघाले होते. दरम्यान, लोणंद येथील विश्रामगृहाजवळ त्यांच्या दुचाकीला टेम्पोची जोराची धडक झाली. या धडकेत दत्तात्रय हे टेम्पोच्या मागील चाकाखाली आल्याने त्यांचा जागीच मृत्यू झाला. तर दुचाकीच्या मागे बसलेले त्यांचे मित्र सतिश लकडे हे रस्त्याच्या बाजूला पडल्याने किरकोळ जखमी झाले. अपघातानंतर टेंम्पो चालकाने पलायन केले. लोणंद पोलिस अधिक करीत आहेत. मृतदेहाचे शवविच्छेदन करण्यासाठी मृतदेह प्राथमिक आरोग्य केंद्र या ठिकाणी पाठविण्यात आला असून पुढील तपास लोणंद पोलीस करीत आहेत.

### सिव्हिल हॉस्पिटलमधून गंठणाची चोरी

**सातारा :** सिव्हिल हॉस्पिटल मधून गंठणाची चोरी झाल्याची नोंद सातारा शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी, दि. २६ फेब्रुवारी रोजी साडेनऊ वाजण्याच्या सुमारास सिव्हिल हॉस्पिटल सातारा येथील वार्ड नंबर १० मधून निकिता सतीश चव्हाण रा. मल्हार पेठ, ता. पाटण यांचे अर्धा तोळा वजनाचे, वीस हजार रुपये किंमतीचे मिनी गंठण कौसर असिफ शेख (पत्ता माहीत नाही) यांनी चोरून नेले असल्याची फिर्याद सातारा शहर पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आली आहे. अधिक तपास पोलीस हवालदार मेचकर करीत आहेत.

### एकावर कुकरीने वार केल्याप्रकरणी तिघांवर गुन्हा

**सातारा :** एकावर कुकरीने वार केल्याप्रकरणी तिघांवर कोरेगाव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी, दिनांक २६ फेब्रुवारी रोजी दुपारी दीड वाजण्याच्या सुमारास लहान मुलांची भांडणे सोडवण्यासाठी गेलेल्या खेलाजी महादेव मदने रा. शिवथर, ता. सातारा याला अक्षय मोहन जगदाळे, सुनील गणेश जगदाळे, जय तानाजी यादव सर्व रा. कुमठे, ता. कोरेगाव यांनी लाथाबुक्क्यांनी आणि कुकरीने मारहाण करून जखमी केले. याबाबत संबंधितांवर कोरेगाव पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला असून अधिक तपास पोलीस नाईक कुंभार करीत आहेत.

## हॉटेलमधील नोकराने लांबवला ३१ हजारांचा मुद्देमाल

**सातारा :** हॉटेलमधील नोकराने ३१ हजारांचा मुद्देमाल लांबवल्याची तक्रार सातारा तालुका पोलीस ठाण्यात नोंदविण्यात आली आहे.

याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी, दि. २५ ते २६ फेब्रुवारी दरम्यान हॉटेल हेरिटेज व्हिला, आटाळी, ता. सातारा या हॉटेलमध्ये कामास असलेल्या निलेश प्रकाश शेलार याने हॉटेलमध्ये राहण्यास असलेल्या खासेराव रामचंद्र माने रा. धायरी, पुणे यांचा दहा हजार रुपये किंमतीचा मोबाईल व मोबाईलच्या कव्हर मध्ये असलेले एक हजार रुपयांची रोख रक्कम, हॉटेलच्या कॅश काऊंटर मध्ये असलेले वीस हजार रुपये असा एकूण ३१ हजार रुपये किमतीचा मुद्देमाल चोरून नेला आहे.

याबाबतची फिर्याद सातारा तालुका पोलीस ठाण्यात नोंदविण्यात आले असून अधिक तपास पोलीस हवालदार वायदंडे करीत आहेत.

## साताऱ्यातील रस्त्यांची लवकरच होणार दुरूस्ती

### सातारा पालिकेच्या प्रशासकीय सभेत निर्णय; ६३ विषयांनी मंजुरी

**सातारा : प्रतिनिधी**

भुयारी गटार योजनेमुळे खराब झालेल्या रस्ता दुरुस्तीला पालिकेने मुहूर्त शोधला आहे . खुदाई पूर्ण झालेल्या शहराच्या पश्चिम भागातील रस्त्यांच्या दुरुस्ती प्रस्तावांना पालिकेने हिरवा कंदिल दिला आहे . मंगळवारी पालिकेच्या कमिटी हॉलमध्ये झालेल्या प्रशासकीय सभेत एकूण ६३ विषयांना मंजूरी देण्यात आली आहे .सभेच्या अध्यक्षस्थानी प्रशासक अभिजीत बापट होते .

अनेक महिन्यांपासून प्रतीक्षेत असलेल्या शाहू चौक ते बोगदा या रस्त्याच्या डांबरीकरणाचा प्रश्न आता मार्गी लागला आहे. मंगळवारी झालेल्या पालिकेच्या प्रशासकीय सभेत शाहू चौक ते बोगदा तसेच भुयारी गटार योजनेमुळे दुरवस्था झालेल्या शहरातील सर्वच रस्त्यांचे डांबरीकरण करण्याचा निर्णय घेण्यात आला.

सातारा पालिकेची प्रशासकीय सभा मंगळवारी सायंकाळी पाच वाजता पालिकेच्या छत्रपती शिवाजी महाराज सभागृहात प्रशासक तथा मुख्याधिकारी अभिजित बापट यांच्या उपस्थितीत पार पडली. या सभेला नगर अभियंता दिलीप चिद्रे, लेखा परीक्षक कल्याणी भाटकर, पाणीपुरवठा अभियंता शहाजी वाठारे, स्थावर विभागप्रमुख प्रणीता शेंडगे यांच्यासह यांच्यासह विविध विभागांचे प्रमुख उपस्थित होते.

सभा अधीक्षक अतुल दिसले यांनी अजेंड्यावरील ६३ विषयांचे तपशीलवार वाचन केले.

यानंतर मुख्याधिकाजयांसह विभागप्रमुखांनी सर्वच विषयांवर सविस्तर चर्चा केली. एकूण ६३ विषय या सभेत मंजुर करण्यात आले. शाहू चौक ते बोगदा या रस्त्याची खड्ड्यांमुळे प्रचंड दुरवस्था झाली आहे. त्यामुळे या रस्त्याचे डांबरीकरण करावे, अशी मागणी नागरिकांसह वाहनधारकांमधून सातत्याने केली जात होती. या रस्त्याच्या डांबरीकरणासह भुयारी गटार योजनेच्या कामामुळे खराब झालेल्या रस्त्यांच्या डांबरीकरणाचा महत्वूपर्ण निर्णय सभेत घेण्यात आला.

**या प्रमुख विषयांना मंजुरी**

**हद्दवाढ भागात वीजेसाठी नवीन पोल व एलईडी दीवे बसविणे, दरे, शाहूपुरी, करंजे, खेड, गोडोली, विलासपूर, शाहूनगर व त्रिशंकू भागात घरोघरी जावून कचरा संकलन करण्यासाठी घंटागाडी चालक व मजुर पुरविणे, आयुर्वेदिक गार्डन येथे खेळणी बसविणे, अजंठा चौक येथील उड्डाणपुलाखालील जागा विकसीत करणे, शहरातील मुख्य रस्त्यांना थर्मोप्लास्ट पेंट मारणे, शहरातील खुल्या जागा, दुभाजक व चौकांचे सुशोभीकरण करणे आदी विषय सभेत मंजुर करण्यात आले.**

## सातारा जिल्ह्यातील रस्ते अपघात कमी करण्यासाठी आरटीओ कार्यालय सक्रिय

### उपप्रादेशिक परिवहन अधिकारी विनोद चव्हाण

**जिल्ह्यातील वाढती अपघातांची संख्या पाहता याविषयी उप प्रादेशिक परिवहन कार्यालयाकडून उपाययोजना राबविण्यात येत आहेत. अपघातांची संख्या कमी करणे. तसेच रस्ते सुरक्षेमध्ये वाढ करणे हा या उपाययोजनांचा उद्देश आहे. अपघात व अपघाती मृत्यू कमी करण्याच्या दृष्टीने पुढीलप्रमाणे जिल्ह्यासाठी उपाययोजना केल्याची माहिती उपप्रादेशिक परिवहन अधिकारी विनोद चव्हाण यांनी दिली.**

ज्या ठिकाणी वारंवार अपाघात घडतात अशा ब्लॅकस्पॉटनिहाय अधिकारी यांची नेमणूक केली. इतर यंत्रणांशी समन्वयातून ४२ वरुन ०८ इतके ब्लॅकस्पॉट शिल्लक राहिले एकूण ३४ ब्लॅकस्पॉट कमी झाले. रस्ता सुरक्षा व इतर कारवाईबाबत लक्षांक साध्य करण्यासाठी विशेष पथकांची निर्मिती व कारवाई. रस्ता सुरक्षा जनजागृती कार्यक्रमाचे विविध स्तरावर आयोजन. रस्त्याच्या उजव्या बाजूने चाला अशा प्रकारचे अभियान राबाविण्यात आले. राष्ट्रीय, राज्य व इतर रस्ते यांच्याबाबत कारावयाच्या उपाययोजना संदर्भात आवश्यक बाबींची पुर्तता करण्यासाठी समन्वय साधून कामकाज केले. अपघात प्रवण क्षेत्रामध्ये अतिवेगाने होणारे अपघात टाळण्यासाठी अतिवेगाने जाणाऱ्या वाहनांवर कारवाई करण्यात आली. अशा प्रकारची कारवाई यापुढेही चालू राहणार आहे. तालुकनिहाय मोटार वाहन निरीक्षक यांची नियुक्ती करुन संपूर्ण रस्त्याचे सर्वेक्षण करण्यात आले असून त्याबाबतच्या उपाययोजनांसाठी संबंधित विभागास कळविण्यात आले आहे. माहे जानेवारी २०२२ व जानेवारी २०२३ मधील अपघाताचे विश्लेषण करुन कारणे, ठिकाण व त्यामधील घटकांचा अभ्यास करुन त्या त्या महिन्यामध्ये अंमलबजावणीबाबत दिनांक निहाय कार्यक्रम आखणी व अंमलबजावणी करण्यात आली आहे.

**सातारा जिल्ह्यातील अपघातांची आकडेवारी**

१ जानेवारी २०२२ ते ३१ डिसेंबर २०२२ या दरम्यान जिल्ह्यात ४८३प्राणांतिक अपघात झाले आहेत. ३५५गंभीर इजा, ४७जणांना किरकोळ इजा, कोणतीही इजा नाही ५९ असे एकूण ९४४ अपघात झाले आहेत.

प्राणांतिक अपघात व त्याव्यतिरिक्त अपघात यांची तुलना करता प्राणांतिक अपघात हे ५१ टक्के तर त्याव्यतिरिक्त ४९ टक्के अपघात आढळून येतात. शहर व ग्रामीण भागाचा विचार करता शहरी भागात २५.६ टक्के तर ग्रामीण भागामध्ये ७४.४ अपघात घडल्याचे दिसून येतात. अपघातामधील वाहनांचा विचार करता जवळपास ५० टक्के अपघातामध्ये दुचाकी वाहनांचा समावेश आहे. चारचाकी वाहनांचा २६ टक्के तर २४ टक्के अपघातामध्ये अवजड वाहने व इतर यांचा समावेश आहे. अपघाताच्या वेळेनुसार विश्लेषण करावयाचे झाल्यास ५५ टक्के अपघात हे दिवसावेळी (सकाळी ६ ते सायंकाळी ६) घडल्याचे दिसून येतात. तर ३१ टक्के अपघात हे रात्री (सायंकाळी ६ ते रात्री १२ वा. ) दरम्यान. १४ टक्के अपघात हे पहाटे (रात्री १२ ते सकाळी ६ वा.) दरम्यान दिसून येतात. रस्तेनिहाय अपघाताची आकडेवारीचा विचार करता सर्वाधिक अपघात हे राज्य मार्गावर त्यांनतर इतर रस्ते व तुलनेने कमी अपघात हे राष्ट्रीय महामार्गावर झाल्याचे दिसून येते. पादचारी व सायकलस्वार यांचे अपघाताच्या प्रमाणाचा विचार करता ९५ अपघतामध्ये पादचारी यांचा समावेश आहे तर १९ अपघातामध्ये सायकलस्वार यांचा समावेश होतो. एकूण




अपघाताच्या जवळपास २० टक्के अपघातामध्ये पादाचारी व सायलस्वार यांचा समावेश होतो.

जानेवारी २०२२ व जानेवारी २०२३ यांचा तुलनात्मक विचार करता जानेवारी २०२२ मध्ये एकूण ८१ अपघात झाले. प्राणांतिक अपघात ३३ तर मृत्यूमुखी संख्या ३७ आहे. जानेवारी २०२३ मध्ये एकूण ९० अपघात झाले. प्राणांतिक अपघात ४३ तर मृत्यूमुख्यी संख्या ४७ आहे. अपघातामध्ये ११.११ टक्के वाढ. प्राणांतिक अपघात ३०.३० टक्के वाढ तर मृत्यूमुखी संख्येत २७ टक्के वाढ निदर्शनास येते.

रस्त्यांचा विचार करता सर्वाधिक अपघत हे राष्ट्रीय महामार्ग त्यांनतर इतर रस्ते व सर्वात कमी अपघात राज्य महामार्गावर दिसून येतात. अपघातामध्ये समाविष्ट वाहनांचा विचार करता ४२ टक्के अपघातामध्ये दुचाकी, २३ टक्के चारचाकी तर ३५ टक्के अपघातांमध्ये अवजड वाहने व इतर वाहनांचा समावेश होतो.

वेळेनुसार अपघताचा विचार करता सर्वाधिक अपघात दिवसावेळी घडल्याचे दिसून येते. त्यानंतर अपघात रात्रीच्या वेळी घडल्याचे दिसून येते. सर्वात कमी अपघात पहाटेच्या वेळी घडल्याचे दिसून येते.

सातारा वायुवेग पथकाने १७ हजार ६४१ वाहनांवर कारवाई करुन तडजोड शुल्कापोटी ३२७.३४ लाख तर कर वसुली ३१७.४१ लाख अशी एकूण ६४४.७५ लाख इतकी रक्कम वसुली केली. कराड वयुवेग पथकाने ४ हजार ९७३ वाहनांवर कारवाई करुन तडजोड शुल्कापोटी ११०.८६ लाख तर कर वसुली ३१.०८ लाख अशी एकूण १७१.६९ लाखाची वसुली केली आहे.

स्पिडगन केसेसमध्ये सातारा कार्यालयामार्फत ८ हजार ४१० तर कराड कार्यालयामार्फत ४ हजार ९७३ वाहनांवरकारवाई करण्यात आली.

**संकलन : जिल्हा माहिती कार्यालय, सातारा**

मालक, मुद्रक, प्रकाशक नरेश विठ्ठल देसाई यांनी राणे प्रकाशन प्रा. लि., सर्व्हे नं. १२९, हिस्सा नं. ११ / २ आणि १ / १३, वारजे पुणे - ४११ ०५८ येथे मुद्रित करून न्याती ग्रँडीयर, १०२ ग्रीनविच, कडनगर, उंड्री, पुणे -४११ ०६० येथून प्रकाशित केले.
✲ संपादक - नरेश विठ्ठल देसाई ✲ दूरध्वनी पुणे - (०२०) २६९०९०३१ ✲ इमेल - rajdand.pune@gmail.com *Declaration No.* : SDM/SR/07/2023

# ४६६ कोटींच्या अंदाजपत्रकाला सातारा पालिकेचा हिरवा कंदील

## हद्दवाढीच्या भागात पायाभूत सुविधांकरिता ५० कोटी रुपयांचे कार्यादेश; पर्यावरण संविधानच्या वापरासंदर्भात २०% घरपट्टी सवलत

**सातारा : प्रतिनिधी**

भरीव विकासकामांचा समावेश असलेले सातारा पालिकेचे ४६६ कोटी ३३ लाख ८४ हजार ३०० रुपयांचे जम्बो बजेट प्रशासकीय सभेत मंगळवारी मंजूर करण्यात आले. पालिकेच्या गंगाजळीत यंदाच्या आर्थिक वर्षात तीन लाख ८८ हजार ३०० रुपयांची शिल्लक दाखवण्यात आली आहे. पालिकेला महसुली जमा खर्च आणि भांडवली जमा खर्च यांचा ताळमेळ बसवताना बरीच कसरत करावी लागली आहे.

यंदाच्या बजेटमध्ये पुढील वर्षी दहा टक्के लोक वर्गणी देणे करिता विविध प्रकल्पांसाठी ४० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. पालिकेच्या छत्रपती शिवाजी सभागृहात प्रशासक अभिजीत बापट यांच्या अध्यक्षतेखाली हे बजेट सादर करण्यात आले. अतिरिक्त मुख्याधिकारी पराग कोडगुले, मुख्य अभियंता दिलीप चिद्रे, मुख्य लेखापाल आरती नांगरे, सहायक लेखापाल हिम्मतराव पाटील, लेखा विभागाचे वरिष्ठ लिपिक भालचंद्र डोंबे तसेच सातारा पालिकेचे सर्व विभाग प्रमुख यावेळी उपस्थित होते.

पालिकेच्या सुधारित बजेटचे वाचन भालचंद्र डोंबे यांनी केले २०२३- २४ या बजेटमध्ये उत्पन्नांच्या बाजूचा विचार करता मालमत्ता कर २१ कोटी रुपये, पाणी कर सहा कोटी रुपये, विशेष स्वच्छता कर एक कोटी ७५ लाख, अग्निशमन कर तीस लाख, इमारत भाडे व खुल्या जागा भाडे दीड कोटी, हातगाडा परवाना फी ३० लाख, नाट्यगृह भाडे पाच लाख,विकास कर साडेतीन कोटी, प्रीमियम चार कोटी, मंडई फी १२ लाख, महसुली अनुदाने ४८ कोटी १३ लाख ५० हजार व भांडवली अनुदाने १३८ कोटी ८८ लाख दहा हजार अशा उत्पन्नाच्या ठळक बाबी



नोंदविण्यात आल्या आहेत.

खर्चाच्या बाबी सुद्धा निर्देशित करण्यात आल्या आहेत . कर्मचारी वेतन भत्ते २७ कोटी ४० लाख, निवृत्ती वेतन १६ कोटी, सातवा वेतन आयोग फरक दोन कोटी चाळीस लाख, कार्यालयीन प्रशासकीय खर्च १३ कोटी २१ लाख १५ हजार, मत्तांची दुरुस्ती १० कोटी १८ लाख, शिक्षण मंडळ अंशदान साडेतीन कोटी, शासकीय कर्ज परतफेड दोन कोटी ३० लाख, पाणीपुरवठा विषयक सोयी दोन कोटी ५५ लाख, निवडणूक खर्च एक कोटी सत्तर लाख, थोर व्यक्ती जयंती वर्धापन दिन १५ लाख, पर्यावरण संतुलन ५० लाख, ५% दिव्यांग कल्याणकारी योजना ४० लाख, मागासवर्गीय कल्याण निधी ४० लाख, महिला बालकल्याण निधी ४० लाख या ठळक बाबींचा खर्चात समावेश आहे.

भांडवली विकास कामांसाठी विचार करता नगरपरिषद प्रशासकी इमारतीसाठी ३० कोटी, हद्दवाढ क्षेत्र विकास योजना ३५ कोटी,अधिसूचित नागरी सेवा व सुविधा मजबुतीकरण दहा कोटी, वैशिष्ट्यपूर्ण योजना दहा कोटी, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी वस्ती सुधारणा योजना १७ कोटी, दलितेतर योजना ११ कोटी ५० लाख , पोवई नाका येथे शिवतीर्थ विकसित करणे आठ कोटी व अमृत योजनेअंतर्गत गोडोली तळे विकसन कास धरण नवीन पाईपलाईन व पाणीपुरवठा योजना स्वयंचलन ५८ कोटी, अशा भरीव विकास कामांच्या खर्चाचा समावेश आहे.

पालिकेचे २०२३ २४ चे एकूण संकीर्ण बजेट ४६६ कोटी ३३ लाख ८४ हजार ३०० रुपये असून त्याला प्रशासकीय सभेत मंजुरी घेण्यात आली हे बजेट जिल्हाधिकारी रुचेश जयवंशी यांच्या मंजुरीसाठी पुढील आठवड्यात पाठवण्यात येणार आहे.

**रुपया असा खर्च होणार**

| | |
|---|---|
| आस्थापना व प्रशासकीय खर्च | – १४ रु |
| मतांची दुरुस्ती व देखभाल | – २ रु |
| व्यवहारा करता खरेदी | – २ रु |
| दिलेली अंशदाने व अनुदाने | – १ रु |
| विकास कामे | – ७२ रु |
| संकीर्ण खर्च | – १ रु |
| असाधारण खर्च | – ८ रु |
| एकूण | – १०० रु |

**रुपया असा येणार**

| | |
|---|---|
| दर व कर | – १० रु |
| महसुली अनुदान | – १५ रु |
| भांडवली अनुदान | – ५० रु |
| नगरपरिषद मालमत्ता फी | – ४ रु |
| व्याज विलंब आकार | – २ रु |
| इतर उत्पन्न संकीर्ण | – १ रु |
| ठेवी डिपॉझिट | – १२ रु |
| कर्ज – | – ६ रु |
| एकूण | – १०० रु |

# एका कामाचे उद्घाटन करताना दुसऱ्या विकासकामाचे भूमिपूजन करणे ही आपली विकासकाम करण्याची पद्धती - सुरेंद्र गुदगे

**मायणी : प्रतिनिधी**

एका कामाचे उद्‌घाटन करताना दुसऱ्या विकासकामांचे भूमिपूजन करणे ही आपल्या कामाची पद्धत असल्याचे मत जि. प सदस्य व मायणी अर्बन बँकेचे चेअरमन सुरेंद्र गुदगे यांनी आनफळे गावच्या पिण्याच्या पाणी योजनेचा शुभारंभ करताना केले. ते पुढे म्हणाले की यापूर्वी नारळ फोडला म्हणजे निवडणूक आली आहे असे लोकांचे मत होते त्यामुळे लोकांचा नारळावरील विश्वास उडाला होता. मात्र तो नारळावरील उडालेला विश्वास विकास कामांच्या माध्यमातून पुन्हा बसविण्याचे धोरण आपण आजपर्यंत राबवले आहे. अनफळकरांच्या पाणी प्रश्न पूर्ण करण्यासाठी रुपये २३ लाखांची पाणी योजना मंजूर झाली असून त्या योजनेच्या कामास तातडीने प्रारंभ करून नागरिकांची पिण्याच्या पाण्याची गरज पूर्ण करू असे प्रतिपादन



माजी जि.प.सदस्य सुरेंद्र गुदगे यांनी केले.

अनफळे ता. खटाव येथे साडेआठ लाख रुपये खर्चाची नवीन अंगणवाडी इमारत व जिल्हा परिषदेत रुपये दोन लाखाच्या व्यायाम शाळेच्या साहित्याच्या उद्घाटन तसेच रुपये १० लाख खर्चाचा पाणी बंधारा व २३ लाख रुपये खर्चाच्या पाणी योजनेच्या भूमीपूजन प्रसंगानिमित्त आयोजित समारंभात ते बोलत होते .सदर वेळी कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी संचालक दादासाहेब कचरे ,सरपंच प्रतिनिधी पिंटू पाटील ,माजी सरपंच प्रतिनिधी गणेश कांबळे , माजी सरपंचरघुनाथ यलमर, सुरेश वाडकर ,दिनकर कंड्रे शिवाजीराव देशमुख, भास्कर चौगुले, डॉ. विकास यलमर,ग्रामपंचायत सदस्य स्वप्निल कांबळे ,अरविंद वाडकर, धनाजी आडके ,डॉ. नंदू चौगुले, ग्रा.पं. सदस्य तुषार कंड्रे अशोक कांबळे, चंद्रकांत कांबळे आदी मान्यवर उपस्थित होते.

सुरेंद्र गुदगे पुढे म्हणाले ,यापूर्वी अनफळेमध्ये २५ लाख रुपये खर्चाच्या रस्ता, ५ लाख रुपये खर्चाचा सभा मंडप व १२ लाख रुपये खर्चाच्या ग्रामपंचायतीचे इमारतीचे काम पूर्ण करण्यात आले असून लोकांच्या मागणीनुसार उर्वरित रस्त्याच्या व इतर विकास कामांचे प्रश्न सोडवण्यास प्राधान्य देण्यात येईल.

विकास कामे करणाऱ्याची पाठराखण करण्याची भूमिका गावाने घ्यावी. ज्यांना मते दिली त्यांनी विकासकामे केली का? ज्यांनी विकासकामे केली नाहीत त्यांना मते देऊन विकासकामे करणाऱ्यावर निश्चितच परिणाम होतो. केवळ निवडणुकीपुरते मते मागावयास येणाऱ्या व्यक्तींना आपल्या गावात कोणती विकास कामे केली हे विचारा. राजकारण कोणास मोठे करण्यासाठी की आपल्या प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी ते देखील ग्रामस्थांनी ठरवावे. लोकांची विकासकामे केल्यामुळे आपण मने जिंकत गेलो व त्यामुळेच आज गावो गावच्या ग्रामपंचायत, सोसायटीमध्ये आपल्या विचारांच्या झाल्या आहेत. या गटात अन्य कोणीही नेत्याने कामे केलेली नसल्याने गावोगावी परिवर्तन होत आहे व या परिवर्तनात आपणास सहभागी व्हावे लागेल. या भागाच्या पाणी प्रश्नासाठी आपण पक्षाच्या मान्यवरांच्या सहकार्यातून पूर्ण ताकदीने प्रयत्नशील राहू असे आवाहन त्यांनी केले .

यावेळी कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक दादासाहेब कचरे व ग्रामपंचायत सदस्य तुषार कंड्रे यांनी आपली मनोगते व्यक्त केली. आभार योगेश यलमर यांनी मानले तर सूत्रसंचलन सावता यलमर यांनी केले.

# जिजाऊंच्या नावे दिल्या जाणाऱ्या पुरस्काराने आयुष्याला बळ येईल – जगन्नाथ शिंदे

## राष्ट्रमाता जिजाऊ आदर्श माता पुरस्काराने पार्वती जवळ सन्मानित

**मेढा : प्रतिनिधी**

श्रीमंत रामराजे नाईक-निंबाळकर यांच्या अमृत महोत्सवा निमित्त छत्रपती श्री संभाजी महाराज ६ वे साहीत्य संमेलन फलटण येथे मराठी राजभाषा दिनाचे औचित्य साधून संपन्न झाले. या कार्यक्रमात राष्ट्रमाता जिजाऊ आदर्श माता पुरस्कार सामाजिक कार्यकर्ते व व्यसनमुक्त युवक संघाचे मार्गदर्शक श्री विलासबाबा जवळ यांच्या मातोश्री, श्रीमती पार्वती शंकर जवळ (जवळवाडी) यांना ॲग्रोन्युज परिवार चॅरीटेबल ट्रस्टच्या वतीने संमेलनाध्यक्ष जेष्ठ साहित्तिक जगन्नाथ शिंदे यांचे शुभहस्ते देण्यात आला.

पार्वती जवळ यांनी अत्यंत खडतर परस्थितीत संघर्षमय जीवन जगत आपल्या मुलांना घडविण्याचे काम केले आहे. विलासबाबा जवळ यांच्या कार्यातून त्यांनी दिलेले संस्कार दिसून येतात.ज्या आईला व्यसनाधिनतेचे चटके सोसावे लागले अशा मातेच्या हयातीतच संपूर्ण तालुका दारू दुकानमुक्त करण्याचे काम विलासबाबांनी महिलांच्या माध्यमातून करून दाखविले. अतिशय कष्टमय जीवन जगत असताना पार्वती आईंनी मोलमजूरी करीत अगदी बिगारी काम सुध्दा केले.अशा या मातेला ॲग्रोन्युज परिवार चॅरीटेबल ट्रस्टच्या वतीने सोमवार दि.२७ फेब्रुवारी रोजी विधान परिषदेचे मा.सभापती मा.श्रीमंत रामराजे नाईक-निंबाळकर यांच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त आयोजीत केलेल्या कार्यक्रमात पार्वती जवळ यांना राष्ट्रमाता जिजाऊ आदर्श माता पुरस्काराने गौरविताना त्यांना सन्मानचिन्ह,मानपत्र, शाल-श्रीफळ व मानाचा फेटा देवून गौरविण्यात आले.

या प्रसंगी बोलताना जगन्नाथ शिंदे यांनी या कार्यक्रमाचे कौतुक करून राष्ट्रमाता जिजाऊंनी दिलेल्या संस्कारातूनच छ.श्री शिवाजीमहाराज, छ.संभाजी महाराज घडले आणि आयुष्यभर स्वराज्यासाठी लढले.अशा राष्ट्रमाता जिजाऊंच्या नावे दिल्या जाणार्या पुरस्कारामुळे जवळ कुटुंबाला भावी आयुष्य जगताना नक्कीच बळ मिळेल. या कार्यक्रमाला जेष्ठ साहित्यिका संगिता जामगे, दुष्यंत जगदाळे, ॲग्रोन्युज परिवारचे अध्यक्ष प्रकाश सस्ते,कार्याध्यक्ष प्रा.नितीन नाळे, विलासबाबा जवळ, अरूण जवळ, द्रोपदा जवळ इ.मान्यवर उपस्थित होते.

# गावची शाळा ही विद्यार्थ्यांचे व्यक्तिमत्व घडविणारी सामाजिक संस्था असते - विश्वास शिंगाडे

**मायणी : प्रतिनिधी**

रयत शिक्षण संस्थेच्या निमसोड ता खटाव येथील सिद्धनाथ विद्यालयात इयत्ता दहावी च्या.मार्च २०२३ परीक्षेला सामोरे जाणाऱ्या विद्यार्थ्यांचा शुभचिंतन सोहळा नुकताच संपन्न झाला या वेळी निमसोड गावचे सुपुत्र व या शाळेचे माजी विध्यार्थी स पो नी विश्वास शिंगाडे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना म्हणाले की गावची शाळा ही विद्यार्थ्यांचे व्यक्तीमत्व घडवणारी सामाजिक संस्था असते, मातीला जसा आकार ओले असताना देता येतो तसेच गावाच्या शाळेत शिक्षकांकडून विद्यार्थ्यांना घडवणारे शिक्षण मिळते हे नक्की , कारण मी ही याच शाळेत घडलो त्यामुळे आज तुमच्या समोर एक कर्तव्यदक्ष




आधिकारी म्हणून उभा आहे.

तसेच या कार्यक्रमात आपल्या जिवनातील अनेक प्रसंग व आठवणी सांगून विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षांना कसे सामोरे जावे याबद्दल मार्गदर्शन केले .कार्यक्रमाचे अध्यक्ष ॲड. किसनराव खामकर तर प्रमुख पाहुणे उपअभियंता श्री राजेंद्र पवार होते या कर्यक्रमास या शाळेचे मुख्याध्यापक लंगडे सर शाळा व्यवस्थापन. कमीटी सदस्य शीकांत मोरे, भास्कर पवार व मा. नंदकुमार मोरे तसेच मा.उपसरपंच संतोष देशमुख, ग्रा.पं सदस्य शशीकांत मोरे, मा.विद्यार्थी संघाचे सदस्य अमोल मोरे , रमेश चव्हाण, माता पालक अर्चनाताई मोरे ,प्रतिभा मोरे इत्यादी मान्यवर उपस्थित होते. मान्यवरंचा सत्कार व कार्यक्रमाचे प्रास्तविक मा.मुख्याध्यापक फडतरे सर यांनी केले. कार्यक्रमात विद्यार्थी मनोगत राधीका घाडगे व प्रणव भादुले यांनी व्यक्त केले. श्री पवार सर यांनी आभार तर सुत्रसंचलन श्री निंबाळकर यांनी केले.

## विवाहितेचा जाचहाट केल्याप्रकरणी पाच जणांवर गुन्हा

**सातारा :** विवाहितेचा जाचहाट केल्याप्रकरणी पाच जणांवर वाठार पोलीस स्टेशन मध्ये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी, दि. ४ ऑगस्ट २००५ ते २५ फेब्रुवारी २०२३ दरम्यान वेळोवेळी स्मिता विजय धुमाळ रा. सोनके, ता. कोरेगाव या विवाहितेचा जाचहाट केल्याप्रकरणी पती विजय शंकर धुमाळ, सासु कलावती शंकर धुमाळ, सासरे शंकर नानासो धुमाळ, दीर महेंद्र शंकर धुमाळ, जाऊ वर्षा महेंद्र धुमाळ यांच्यावर वाठार पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

अधिक तपास एएसआय एस. जी. मठपती करीत आहेत.

# कोरेगाव नगरपंचायतीच्या विषय समितीच्या सभापती निवडीत सत्ताधारी आघाडीचा वरचष्मा

**कोरेगाव : प्रतिनिधी**

कोरेगाव नगर पंचायतीच्या विषय समितीच्या सभापतीच्या निवडी आज जाहीर झाल्या. या निवडीमध्ये सत्ताधारी विकास आघाडीचा वरचष्मा राहिल्याचे स्पष्ट झाले. विरोधी राष्ट्रवादी काँग्रेसला एकाही पदावर संधी मिळाली नाही. स्थायी



समितीच्या पदसिद्ध सभापतीपदी नगराध्यक्षा दिपाली बर्गे तर पाणीपुरवठा जलनि:सारण समितीच्या सभापती उपनगराध्यक्ष सुनील बर्गे यांची निवड झाली.

मंगळवारी दुपारी प्रांताधिकारी ज्योती पाटील यांच्या अध्यक्षतेखाली व कोरेगाव नगर पंचायतीच्या मुख्यधिकारी विजया घाडगे यांच्या प्रमुख उपस्थितीत या निवडी बिनविरोध झाल्या. प्रत्येक विषय समितीच्या सभापती पदासाठी एकच उमेदवारी अर्ज दाखल झाला होता त्याप्रमाणे या निवडी झाल्या. बांधकाम समितीच्या सभापतीपदी नगरसेविका संगीता ओसवाल, महिला व बालकल्याण समितीच्या सभापतीसाठी नगरसेविका शीतल बर्गे, नियोजन समितीच्या सभापतीपदांसाठी नगरसेविका वनमाला बर्गे यांची निवड झाली.

निवड झालेल्या सर्व सभापतींचे यावेळी अभिनंदन करण्यात आले. यावेळी सर्व नगरसेवक, नगरसेविका उपस्थित होते.

# आयुष्यभर विद्यार्थ्यांच्या भूमिकेत राहिलो तर जास्तीत जास्त शिकता येईल - प्राचार्य मा. के. यादव

**मेढा : प्रतिनिधी**

चांगले प्राध्यापक चांगले विद्यार्थी घडवतात तर चांगले विद्यार्थी चांगले प्राध्यापक घडवतात . प्राध्यापकांनी आयुष्यभर विद्यार्थी म्हणूनच राहीले पाहीजे तरच जास्तीत जास्त ज्ञान आत्मसात करता येईल. प्रा. भगवानराव पाटील यांचे काम मी जवळून पाहील आहे. हाडाचा प्राध्यापक कसा असावा तर ह्यांच्या सारखा. आजच्या माजी विद्यार्थी मेळाव्यामध्ये त्यांच्या गौरव अंकाच प्रकाशन करण्यात आले . ही त्याच्या कार्याची पोचपावती आहे . असे गौरवोद्गार प्राचार्य मा. के . यादव यांनी आपल्या भाषणात बोलताना काढले.

छत्रपती शिवाजी कॉलेज सातारा येथील मराठी विभाग आयोजीत माजी विद्यार्थी मेळावा आणि मराठी विभाग विकास .व मराठी भाषा संवर्धन .... आपली जबाबदारी या विषयावर परिसंवाद तसेच गुरुवर्य प्रा. बी. डी. पाटील '' प्रेरणास्तंभ '' या गौरव ग्रंथाचा प्रकाशन सोहळा अशा विविध कार्यक्रमांचे आयोजन प्राचार्य मा. के. यादव यांचे अध्यक्षतेखाली करण्यात आले होते .

या प्रसंगी रयत संस्थेचे सहसचिव शिवलिंग मेनकुदळे , प्राचार्य श्रीधर हेरवाडे , प्राचार्य माने, प्रा. बी .डी. पाटील , प्रा. डॉ. बाबुराव उपाधे, प्रा. शिवाजी पाटील, प्रा. उत्तमराव सुर्यवंशी., प्रा . नलिनी महाडीक, प्रा. मानसी लाटकर, प्रा. मीरा देठे , प्रा. निकम मॅडम, प्रा. ए. वाय . यादव ,प्रा. सुभाष बागवडे, प्रा .आर .एस. यादव, प्रा. मेनसे सर, प्रा. सुमन निकम, प्रा. विश्वजीत जाधव, प्रा. पोपट काटकर.आदी गुरुवर्य मान्यवर मंडळी उपस्थित होती.

याप्रसंगी मार्गदर्शन करताना प्रा. डॉ. बाबुराव उपाध्ये म्हणाले, छत्रपती शिवाजी कॉलेजमध्ये अनेक हस्ती होवून गेल्या त्यामध्ये प्रा. भगवानराव पाटील यांचा समावेश आहे. कर्मवीर अण्णांनी संस्था उभी केली म्हणून माझ्या सह तुमच्यासारखी सर्वसामान्य गरीब कुटुंबातील मुलं शिकत गेली . शिकत आहेत. आ0णांच्या विचाराची, संस्काराची शिदोरी असीच तेवत राहीली पाहीजे. विज्ञानाबरोबर माणूसकीही



**गुरूवर्य प्रा. बी. डी. पाटील यांचा गौरव सन्मानपत्र देवून सत्कार करताना शिवाजी कॉलेजचे व सरांचे माजी विद्यार्थी.**

स्विकारली पाहीजे. शद्बाने माणसे जोडता येतात तर शब्दच माणसे तोडतात. त्यामुळे शद्ब महत्वाचे आहे. असे त्यांनी सुचित केले

यावेळी रयत संस्थेचे सहसचिव प्रा. डॉ. शिवलींग मेनकुदळे म्हणाले , मराठी साहित्य क्षेत्रामध्ये '' प्रेरणास्तंभ '' या ग्रंथाच्या निर्मिती मुळे चांगली पिढी निर्माण . होण्यास प्रेरणा मिळत राहील. प्रा . पाटील सरांचे बरोबर काम करण्याची संधी मिळाली हे मी माझ भाग्य समजतो. असे सुचित केले. तर प्रा. माने सर बोलताना म्हणाले शिवाजी कॉलेजची समृध्द परंपरा प्रा. डॉ. सुभाष वाघमारे संरांनी कायम सुरु ठेवली आहे ही अभिमानाची गोष्ट आहे. प्रा. पाटील सर अत्यंत प्रतिकुल परिस्थीतीतून उभे राहीले आहेत. सर म्हणजे माणसं मिळवणारी चालती बोलती प्रयोग शाळाच आहेख असे गौरोद्गार काढले.

आपल्या सत्काराला उत्तर देताना प्रा .भगवानराव पाटील , म्हणाले . . आज समाजामध्ये पाठीवर हात ठेवून लढ म्हणणारांची गरज आहे. माझी सहचारणी प्रेमळ स्वभावाची असल्यामुळेच माझा माझी विद्यार्थ्यांचा संच खुप मोठा आहे. असे सांगताना पत्नीच्या आठवणीने त्यांचा कंठ दाटून आला. पुढे बोलताना ते म्हणाले, विद्यार्थ्यांना मी पुस्तकी ज्ञानाबरोबरच , व्यवहारज्ञान शिकवत होतो. विद्यार्थी हीच माझी संपत्ती आहे . ''शामच्या आईच्या '' पुस्तकाचा प्रभाव कायम माझ्यावर आहे. त्यामुळेच मला विद्यार्थी घडविता आले. मुलांवर , प्राणी मात्रावर , समाजातील प्रत्येक घटकावर प्रेम कसे करावे हे मला साने गुरुजींच्या कडून शिकायला मिळाले. ३८ वर्षांच्या रयतच्या सेवेत अनेक विद्यार्थी घडवले .व ते माझ्याशी कुटुंबा प्रमाणे जोडले आहेत . हीच माझी खुप मोठी संपत्ती आहे. असे त्यांनी सांगीतले.

यावेळी माजी विद्यार्थी यांचे वतीने प्रतिनिधी म्हणून समृध्दी जाधव यांनी आपले मनोगत व्यक्त केले.

प्रारंभी उपस्थीत मान्यवर , जेष्ट गुरुवर्य यांचे हस्ते छत्रपती शिवाजी महाराज, कर्मवीर भाऊराव पाटील, यांचे प्रतिमेचे पुजन करण्यात आले . त्यानंतर गुरुवर्य प्रा . बी .डी. पाटील यांच्यावर माजी विद्यार्थी यांनी तयार केलेल्या ''प्रेरणास्तंभ '' या गौरवग्रंथाचे प्रकाशन मान्यवरांचे हस्ते करण्यात आहे. गौरव ग्रंथासाठी लेखन केलेल्या माजी विद्यार्थांचा प्रा. पाटील सरांचे हस्ते गौरव ग्रंथ देवून सन्मान करण्यात आला. तर माझी विद्यार्थी यांचे वतीने गौरव सन्मानपत्र देवून सरांचा यथोचीत सन्मान करण्यात आला.


कार्यक्रमाचे आयोजक, प्रेरणास्तंभ गौरव ग्रंथाचे संपादक प्रा. डॉ. सुभाष वाघमारे यांनी मान्यवरांचे स्वागत व प्रास्ताविक भाषणातून कार्यक्रमाचा हेतू विषद केला. प्रा. पोपटराव काटकर, प्रा. विश्वजीत जाधव यांनी सूत्रसंचलन, तर प्रा. सुनिल शिंदे यांनी आभार मानले.

# संयुक्त राष्ट्रांच्या बैठकीत 'कैलासा'ची एंट्री : फरार झालेल्या स्वामी नित्यानंदाने स्थापन केला देश

## भारताकडून छळ होत असल्याचा केला आरोप

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

बलात्काराचा आरोपी नित्यानंदने आता भारतावर आपला छळ केल्याचा आरोप केला आहे. बलात्काराच्या आरोपी नित्यानंदने स्थापन केलेल्या देश कैलासने नुकत्याच जीनिव्हा येथे झालेल्या संयुक्त राष्ट्रांच्या बैठकीत भाग घेतला होता. कैलासाच्या प्रतिनिधीने बैठकीत सांगितले की, नित्यानंद यांचा भारताकडून छळ होत आहे. स्वत:ला विजयप्रिया नित्यानंद म्हणवणारी एक महिला गेल्या आठवड्यात कैलासाची कायमस्वरूपी राजदूत म्हणून जीनिव्हा येथे आर्थिक, सामाजिक आणि सांस्कृतिक हक्क समितीच्या (सीईएससीआर) बैठकीत सहभागी झाली होती.



विजयप्रिया नित्यानंद या महिलेने सांगितले की, त्याच्या वक्तव्याचा एक व्हिडिओ संयुक्त राष्ट्रांच्या वेबसाइटवरही अपलोड करण्यात आला आहे. कैलासाचे कायमस्वरूपी राजदूत व्यतिरिक्त, पुरुष प्रतिनिधी एन. कुमार हेही बैठकीत बोलले. एन. कुमार यांनी बाहेरील पक्षांच्या संसाधनांवर नियंत्रण ठेवण्याच्या मुद्द्यावर प्रश्न उपस्थित केला. ते म्हणाले की, अनेक वेळा असे दिसून येते की स्थानिक कायदे देशातील शेतकऱ्यांवर अनेक निर्बंध लादतात.

**हिंदूसाठी बनला आहे 'कैलास' हा देश**

कैलास हे कथितरीत्या इक्वेडोरच्या किनारपट्टीवर स्थित आहे. देशाचा स्वत:चा पासपोर्ट, ध्वज आणि कैलासा रिझर्व्ह बँकही आहे. सप्टेंबर २०२० मध्ये नित्यानंद यांनी त्यांच्या तथाकथित देशासाठी उड्डाणे सुरू करण्याची घोषणाही केली होती. कैलासाच्या वेबसाइटवर या देशाचे वर्णन पृथ्वीवरील सर्वात मोठे हिंदू राष्ट्र म्हणून करण्यात आले आहे. ज्यांनी स्वत:च्या देशात हिंदू धर्माचे पालन करण्याचा अधिकार गमावला आहे, अशा वंचित हिंदूसाठी स्थापन केलेले सीमा नसलेले राष्ट्र असे त्याचे वर्णन करण्यात आले आहे.

**२०१९ मध्ये भारतातून फरार झाला होता नित्यानंद**

नित्यानंद २०१९ मध्ये भारतातून फरार झाला होता. नित्यानंद हा भारतीय दंड संहिता अंतर्गत बलात्कार, छळ, अपहरण आणि मुलांना चुकीच्या पद्धतीने कैद करणे यासह भारतातील अनेक प्रकरणांमध्ये मुख्य आरोपी आहे. ४,००,००० डॉलरच्या कथित फसवणुकीसाठी फ्रेंच अधिकाऱ्यांकडून त्याची चौकशी केली जात आहे.

जानेवारी २०२० मध्ये इंटरपोलने वादग्रस्त स्वयंघोषित संताची माहिती मागणारी ब्लू कॉर्नर नोटीस जारी केली होती. आंतरराष्ट्रीय पोलिस सहकार्य संस्थेद्वारे एखाद्या गुन्ह्याच्या संबंधात एखाद्या व्यक्तीची ओळख, स्थान किंवा व्यवहार याबद्दल त्याच्या सदस्य देशांकडून अतिरिक्त माहिती गोळा करण्यासाठी ब्लू कॉर्नर नोटीस जारी केली जाते. गेल्या ऑगस्टमध्ये बंगळुरूजवळील रामनगरा येथील स्थानिक न्यायालयाने २०१०च्या बलात्कार प्रकरणात नित्यानंदविरुद्ध अजामीनपात्र वॉरंट जारी केले होते.

**गुजरात पोलिसांनाही हवा आहे नित्यानंद**

नोव्हेंबर २०१९ मध्ये गुजरात पोलिसांनी बंगळुरूस्थित एका जोडप्याच्या तक्रारीवरून नित्यानंद आणि आश्रमाच्या दोन संचालकांविरुद्ध मुलांचे अपहरण आणि ओलीस ठेवल्याचा गुन्हा नोंदवला. त्यानंतर अहमदाबाद ग्रामीण पोलिसांच्या तपासात नित्यानंदच्या जवानांनी दोन मुलींना देशाबाहेर पाठवल्याचे उघड झाले. या संपूर्ण प्रकरणात डीपीएस शाळा प्रशासनाला आश्रमाला भाडेतत्त्वावर जमीन देण्यासाठी बोलावण्यात आले होते. ही जमीन आवश्यक कागदपत्रे आणि एनओसीशिवाय आश्रमाला भाडेतत्त्वावर दिल्याचे उघड झाले. प्रदीर्घ तपासानंतर गुजरात पोलिसांनी नित्यानंद यांना घोषित गुन्हेगार घोषित केले होते. तेव्हापासून गुजरात पोलीस नित्यानंदचा शोध घेत आहेत.

नित्यानंद यांच्या वतीने अहमदाबादच्या मणिनगरमध्ये योगिनी सर्वांजपीठम नावाचा आश्रम उघडण्यात आला. या आश्रमासाठीची जमीन डीपीएस शाळेकडून घेण्यात आली होती. या आश्रमातच मुलींना ओलीस ठेवण्याचे प्रकरण समोर आले. नित्यानंद यांच्यावर संशय असल्याची तक्रार बंगळुरूच्या दाम्पत्याने पोलिसांत केल्यावर हे संपूर्ण प्रकरण समोर आले. यानंतर त्यांनी त्यांची चार मुले आणि चार मुलींना बंगळुरू आश्रमात सोडले होते, परंतु मुलींना त्यांच्या नकळत अहमदाबाद आश्रमात हलवण्यात आले. आता त्यांना त्यांच्या मुलींना भेटू दिले जात नाही.

**नित्यानंदच्या ताब्यात दोन मुली**

बंगळुरूतील दाम्पत्याच्या दोन मुली अजूनही नित्यानंदच्या ताब्यात आहेत. अहमदाबादच्या आश्रमात पोलिसांनी केलेल्या कारवाईदरम्यान या दाम्पत्याला त्यांच्या दोन मुली मिळाल्या, मात्र दोन्ही मुलींनी येण्यास नकार दिला. मुलींच्या ताब्यावरून कुटुंबात वाद सुरू आहेत, परंतु नित्यानंद देशातून पळून गेल्यामुळे या जोडप्याच्या दोन मुली अद्याप परत आलेल्या नाहीत. त्यापैकी एका मुलीचे वय सुमारे २३ वर्षे, तर दुसऱ्या मुलीचे वय सुमारे २० वर्षे आहे.

या संपूर्ण प्रकरणावर बंगळुरू येथील जोडप्याने गुजरात उच्च न्यायालयातही अपील केले होते. आश्रमातून दोन मुली बेपत्ता झाल्याप्रकरणी उच्च न्यायालयात सुनावणी झाली. यामध्ये एका मुलीने स्वेच्छेने नित्यानंद यांच्यासोबत राहण्याचे म्हटले. दुसरीकडे या संपूर्ण प्रकरणावर करणी सेनेच्या कार्यकर्त्यांनी आश्रमाबाहेर निदर्शनेही केली होती. पोलिसांनी अटक केलेल्या आरोपींपैकी प्राणप्रिया आणि प्रियतत्त्व यांना तुरुंगात पाठवले होते आणि नित्यानंदला घोषित गुन्हेगार घोषित केले होते.

गुजरात पोलीस या संपूर्ण प्रकरणामध्ये नित्यानंदचा शोध घेत आहेत. युनायटेड नेशन्सच्या बैठकीत त्यांनी घोषित केलेल्या कैलास देशाच्या प्रतिनिधीने हजेरी लावल्याने हे संपूर्ण प्रकरण पुन्हा समोर आले आहे. मात्र, ज्यावेळी या प्रकरणाने पेट घेतला होता, त्यावेळी परराष्ट्र मंत्रालयाने म्हटले होते की, त्यांना गुजरात पोलिसांकडून नित्यानंदचे ठिकाण जाणून घेण्यासाठी कोणताही अर्ज आला नव्हता.

# मनीष सिसोदिया, सत्येंद्र जैन यांचा राजीनामा सीएम केजरीवाल यांनी स्वीकारला

## जैन ९ महिन्यांपासून तुरुंगात, सिसोदियांकडे होती १८ खाती

**नवी दिल्ली : प्रतिनिधी**



दिल्लीतील केजरीवाल सरकारमधील दोन मंत्री मनीष सिसोदिया आणि सत्येंद्र जैन यांनी मंत्रिपदाचा राजीनामा दिला आहे. वृत्तसंस्थेनुसार, मुख्यमंत्री केजरीवाल यांनीही दोघांचा राजीनामा स्वीकारला आहे. राजीनामा दिलेल्या दोन्ही नेते सध्या वेगवेगळ्या गुन्ह्यांमध्ये आरोपी आहेत.

दिल्ली मद्य धोरण प्रकरणात अटक करण्यात आलेल्या मनीष सिसोदिया यांना सर्वोच्च न्यायालयाकडून दिलासा मिळालेला नाही. वृत्तसंस्थेनुसार, सर्वोच्च न्यायालयाने अटकेला आव्हान देणारा सिसोदिया यांचा अर्ज स्वीकारण्यास नकार दिला. न्यायालयाने त्यांना उच्च न्यायालयात जाण्याचा सल्ला दिला आहे.

मीडिया रिपोर्ट्सनुसार, सीजेआय जस्टिस डीवाय चंद्रचूड सिसोदिया यांच्या वकिलाला म्हणाले- तुम्ही हायकोर्टात जायला हवे होते, तुम्ही थेट सर्वोच्च न्यायालयात जामीन का मागत आहात? ही चांगली परंपरा नाही. या निर्णयावर आम आदमी पार्टीने म्हटले आहे - आम्ही न्यायालयाच्या आदेशाचा आदर करतो. आता जामिनासाठी उच्च न्यायालयात याचिका दाखल करण्यात येणार आहे.

केजरीवाल यांच्यानंतर मनीष सिसोदिया हे आम आदमी पक्षातील सर्वात मोठे नेते आहेत. मनीष सिसोदिया यांच्याकडे दिल्ली सरकारमधील एकूण ३३ पैकी १८ खाती आहेत. सिसोदिया यांच्या अटकेनंतर त्यांचे काम कोण सांभाळणार हा सर्वात मोठा प्रश्न आहे. केजरीवाल यांचे आणखी एक मंत्री सत्येंद्र जैन हे आधीच तुरुंगात आहेत. जैन यांच्या विभागांचे कामही सिसोदिया पाहत होते. सिसोदिया यांच्याकडे शिक्षण, सार्वजनिक बांधकाम, वित्त, उत्पादन शुल्क, ऊर्जा, पाणी, आरोग्य अशी महत्त्वाची खाती होती. ते दिवसाला १२ ते १५ बैठका घेत, असे त्यांचे सहकारी सांगतात.

फेब्रुवारी २०२० मध्ये मुख्यमंत्री केजरीवाल यांनी त्यांच्या उर्वरित खात्यांचा त्याग केला होता. यानंतर सिसोदिया ही खातीही पाहत होते. आम आदमी पक्षात सध्या मनीष सिसोदिया यांच्या उंचीचा आणि अरविंद केजरीवाल यांचा विश्वासू असा दुसरा नेता नाही.

दिल्ली सरकार पुढील आर्थिक वर्षाचा अर्थसंकल्प तयार करत आहे. मनीष सिसोदिया हे बजेटचे सर्व काम पाहत होते. आम आदमी पक्ष सत्तेत येण्यापूर्वी दिल्ली सरकारचे बजेट सुमारे ३०,००० कोटी रुपये होते, ते आता ७५,००० कोटी रुपये झाले आहे.

आम आदमी पार्टीच्या १० वर्षांच्या इतिहासात अरविंद केजरीवाल यांच्यासमोर आधी सत्येंद्र जैन आणि आता मनीष सिसोदिया यांची अटक हे सर्वात मोठे आव्हान आहे. सिसोदिया हे दिल्लीतील शिक्षण क्षेत्रातील बदलाचे पोस्टर बॉय आहेत. पक्षाचे अनेक नेते सांगतात की, एक प्रकारे ते दिल्लीचे सरकार चालवतात. राष्ट्रीय स्तरावर पक्षाचा प्रसार करण्यातही सिसोदिया यांची भूमिका महत्त्वाची ठरली आहे.

सत्येंद्र जैन यांना ईडीने गेल्या वर्षी ३० मे रोजी अटक केली होती. तुरुंगातही मजेत जीवन जगणाऱ्या जैन यांचे फोटो आणि व्हिडिओ समोर आले आहेत. मीडिया रिपोर्ट्सनुसार, ईडीने न्यायालयात शपथपत्र आणि काही छायाचित्रे देऊन याबाबत तक्रार केली होती. सत्येंद्र जैन यांना तिहार तुरुंगात अनेक सुविधा मिळत असल्याचे ईडीने म्हटले होते. कारागृहातील उघड फुटेजमध्ये ते पाठ आणि पायाची मालिश करून घेताना दिसत आहेत. कारागृह अधीक्षक नियमाविरुद्ध जाऊन सत्येंद्र जैन यांना भेटतात, मंत्र्याला कारागृहात काही अडचण आहे का, हे विचारण्यासाठी ते जातात.

ईडीने म्हटले होते की, न्यायालयाच्या आदेशाचे उल्लंघन करून सत्येंद्र जैन यांच्यासाठी दररोज त्यांच्या घरातून जेवण आणले जाते. त्यांची पत्नी पूनम जैन अनेकदा त्यांना सेलमध्ये भेटायला येते, हे चुकीचे आहे. या खटल्यातील इतर आरोपींसोबत ते तासनतास त्यांच्या सेलमध्ये मीटिंग घेतात. प्रकरणाच्या तपासासाठी हे योग्य नाही. सत्येंद्र जैन मंत्री असल्याचा चुकीचा फायदा घेत आहेत.

# तलवारीने वार करून तरुणाची भररस्त्यात हत्या

## कर्नाटकातील घटना, जुन्या वैमनस्यातून वाद

**बंगळुरू : वृत्तसंस्था**



कर्नाटकातील बिदर जिल्ह्यात एका २६ वर्षीय तरूणाचा भररस्त्यात तलवारीने हल्ला करून खून करण्यात आला. ही घटना त्रिपुरांत गावात घडली. दुसरीकडे मदत करण्याऐवजी त्या युवकाचा कोणीतही व्हिडिओ तयार केला आहे. हा व्हिडिओ समोर आला असून यात हल्लेखोर तलवारी आणि धारदार शस्त्रे घेऊन आले होते. आनंद फुले असे हल्ला झालेल्या व्यक्तीचे नाव आहे. आनंदवर हल्ला होत होता. तेव्हा त्याला तिथे उपस्थित असलेल्या लोकांनी व्हिडिओ बनवत राहीले. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, जुन्या वादातून आनंदची हत्या झाली आहे.

आनंदची हत्या करून हल्लेखोर पळून गेल्याचे पोलिस अधिकाऱ्यांनी सांगितले. जखमी आनंद फुले यांना उमरगा रुग्णालयात आणण्यात आले, मात्र वाटेतच त्यांचा मृत्यू झाला. या हल्ल्यात आनंदचा मित्रही जखमी झाला. त्याच्यावर बिदरच्या शासकीय रुग्णालयात उपचार करण्यात आले. पोलिस सध्या आरोपीच्या शोधात आहेत.

घटनेनंतर महिलेला तातडीने उदयपुरवती सीएचसीमध्ये नेण्यात आले. यावेळी सीएचसीबाहेर पोलिसांचा ताफा आणि परिसरातील डझनभर लोक उपस्थित होते.

घटनेनंतर महिलेला तातडीने उदयपुरवती सीएचसीमध्ये नेण्यात आले. यावेळी सीएचसीबाहेर पोलिसांचा ताफा आणि परिसरातील डझनभर लोक उपस्थित होते.

राजस्थानात काही दिवसांपूर्वीच झुनझुनू जिल्ह्यातील उदयपुरवती शहरातील पोलिस स्टेशनसमोर गुरुवारी दुपारी ४ वाजेच्या सुमारास एका महिलेची दिवसाढवळ्या हत्या करण्यात आली. मारेकरी हा महिलेचा मेहुणा असल्याचे समोर आले. केशव रायजी वस्तीत राहणाऱ्या राम स्वरूप शिंपी आणि त्याच्या भावांमध्ये वाद झाला. बदला घेण्यासाठी आरोपीने मेहुणीवर चाकूने हल्ला केला होता.

# बिहारचे शिक्षणमंत्री म्हणाले- रामचरित मानसमध्ये कचरा, स्वच्छता गरजेची


## जेडीयू आमदाराने म्हटले - हा चीप पब्लिसिटी स्टंट; हिम्मत असेल तर इतर धर्मांवर बोलावे

**पटना : वृत्तसंस्था**

बिहार राज्याचे शिक्षण मंत्री चंद्रशेखर यांनी पुन्हा एकदा रामचरितमानसवर वादग्रस्त वक्तव्य केले. रामचरितमानसमध्ये कचरा भरलेला आहे, तो साफ करणे आवश्यक आहे, असे ते म्हणाले. तसेच रामचरितमानसच्या आणखी एका ओळीवर त्यांनी प्रश्न उपस्थित केला. अर्थसंकल्पीय अधिवेशनादरम्यान विधानसभेबाहेर ते माध्यमांशी बोलत होते.

याआधीही डॉ.चंद्रशेखर यांनी मनुस्मृती आणि रामचरितमानस या पुस्तकांचे वर्णन समाजात द्वेष पसरवणारे असे केले होते. रामचरित मानस दलित-मागास आणि महिलांना समाजात शिक्षण घेण्यापासून थांबवतो. असे ते म्हणाले होते. या वक्तव्यानंतर बिहारपासून उत्तर प्रदेशपर्यंतचे राजकारण चांगलेच तापले. महाआघाडीचा भाग असलेल्या जेडीयूनेच शिक्षणमंत्र्यांच्या विधानाला विरोध केला. हिंमत असेल तर त्यांनी इतर धर्मांवर प्रश्न उपस्थित करावेत, असे आव्हान दिले.

रामचरितमानस ही मनुस्मृतिइतकीच द्वेष पसरवणारी रचना आहे. खालच्या जातीतील लोक शिक्षित होऊन विषारी होतात, असे 'रामचरितमानस'मध्ये म्हटल्याचा दावा बिहार सरकारमधील मंत्री चंद्रशेखर यांनी यापुर्वीही केला होता.



रामचरित मानसला कचरा म्हटल्यावर पत्रकाराने विचारलेल्या प्रश्नावर ते म्हणाले की, मी हे बोललो नाही, असे डॉ लोहिया यांनी सांगितले. मी त्याचे शब्द पुन्हा सांगत आहे. विधानसभेत माझ्या विधानावर प्रश्नचिन्ह लावण्याचे धाडस कोणात नाही. रामचरित मानसात शूद्रांचा अपमान झाला असे मी आजही म्हणत आहे. लोहिया आणि आंबेडकर यांच्या दृष्टिकोनातून मी वाचले. आजचा शूद्र सुशिक्षित आहे. त्याला फसवता येत नाही.

शिक्षणमंत्र्यांनी मोबाईल काढून ही ओळ वाचली आणि उलट पत्रकारांनाच विचारले की, यावर त्यांचे काय म्हणणे आहे? शिक्षा म्हणजे शिक्षण तर सगळीकडे का बदलले नाही. केवळ एकाच ठिकाणी लीपापोती करण्यात आली आहे.

शिक्षणमंत्री चंद्रशेखर यांच्या वक्तव्यानंतर जेडीयूचे आमदार डॉ. स्वस्त प्रसिद्धीसाठी वक्तव्य करत असल्याचे ते म्हणाले. त्यांना उपचाराची गरज आहे. रामचरित मानसवर कोणीही प्रश्न करू शकत नाही. हिंमत असेल त्यांनी इतर धर्मांबद्दल वक्तव्य करावे. आजही ते अशी विधाने करत आहेत हे हिंदू धर्माचे मोठेपण आहे.

बिहारचे शिक्षणमंत्री चंद्रशेखर (ते राष्ट्रीय जनता दलाचे आहेत) अलीकडे म्हणाले की, तुलसीदासांचे रामचरितमानस सामाजिक विभाजनाचा प्रचार करते आणि समाजात द्वेष पसरवते. माझ्या मते, आपण असे बोलतो तेव्हा रामचरितमानसच्या मूळ भावनेबाबत घोर अज्ञान दाखवतो. मानसवर टीका होत आहे ही माझी समस्या नाही, कारण हिंदू धर्म टीकाकारांचे स्वागत करतो.

# १८ पाकिस्तानींचे ४ हजार अब्ज रुपये बँकांमध्ये : विरोधी पक्षनेत्याकडे यादी; अधिकाऱ्याच्या मुलीला लग्नात १.२० अब्ज रोख मिळाले

**इस्लामाबाद : वृत्तसंस्था**

पाकिस्तानातील सर्वात मोठा राजकीय आणि धार्मिक पक्ष जमियत-ए-इस्लामीचे प्रमुख सिराज-उल-हक यांच्या मते, देशातील १८ लोकांच्या बँकांमध्ये ४ हजार अब्ज रुपये जमा आहेत. या लोकांच्या नावांची संपूर्ण यादी आपल्याकडे असल्याचा दावा हक यांनी केला. पाकिस्तान दिवाळखोरीच्या उंबरठ्यावर असून हे लोक हवे असल्यास देशाला दिवाळखोरीपासून वाचवू शकतात, असेही ते म्हणाले.

सिराज हे इम्रान खान यांच्या जवळचे मानले जातात. अलीकडेच त्यांनी इम्रान खान यांची जमान पार्क येथील निवासस्थानी भेट घेतली. पाकिस्तानवर सध्या १०० अब्ज डॉलरचे कर्ज आहे. महागाईचा दर ४० टक्क्यांच्या जवळ पोहोचला आहे. सरकारकडे केवळ २.७ अब्ज डॉलर्सच्या विदेशी ठेवी आहेत.

संरक्षण मंत्री ख्वाजा आसिफ यांनी एका अधिकाऱ्याच्या मुलीला तिच्या लग्नात फक्त रोख भेट म्हणून १ अब्ज २० कोटी रुपये (पाकिस्तानी चलन) मिळाल्याचा खुलासा केला आहे.

सामान्यतः पाकिस्तानातील लोक राजकारणी आणि सैनिकांवर आरोप करण्यास घाबरतात. सिराज-उल-हक यांनी या प्रकरणात अजिबात संकोच केला नाही.



इस्लामाबादमध्ये पत्रकार परिषदेदरम्यान जमियतचे प्रमुख म्हणाले की, केवळ १८ पाकिस्तानी देशाला दिवाळखोरीपासून वाचवू शकतात. त्यांच्या विविध बँकांमध्ये सुमारे ४ हजार अब्ज रुपये जमा आहेत.

हक पुढे म्हणाले की, माझ्याकडे या सर्व लोकांची यादी आहे. यामध्ये राजकारणी, लष्करी अधिकारी, न्यायाधीश आणि नोकरशहा यांचा समावेश आहे. आता या लोकांनी देशासाठी बलिदान देण्याची, त्यांच्या खात्यातून पैसे काढण्याची आणि देशाची अर्थव्यवस्था सुधारण्यासाठी गुंतवणूक करण्याची वेळ आली आहे.

सिराज म्हणाले की, आज पाकिस्तानसाठी करा वा मरोची परिस्थिती आहे. आज जर या लोकांनी देश वाचवला नाही. तर कदाचित त्यांना ही संधी कधीच मिळणार नाही. महागाईचा दर ४० टक्क्यांवर पोहोचला आहे. सरकार पूर्णपणे निरुपयोगी असल्याचे सिद्ध झाले आहे.

धर्माचे राजकारण करणारे सिराज पुढे म्हणाले की, शाहबाज शरीफ यांच्या नेतृत्वाखालील पाकिस्तान डेमोक्रेटिक मुव्हमेंट (पीडीएम) सरकार काय करत आहे? असा सवाल त्यांनी केला. देशात पीठ १६० रुपये किलो झाले आहे. ज्या व्यक्तीच्या घरात १२ सदस्य आहेत, तो कुटुंब प्रमुख घरातील लोकांचे कसे पोट भरवणार. याचा बोजा दररोज गरिबांवर टाकला जात आहे. आता परिस्थिती अशी झाली आहे की, सरकार श्वासावरही कर लावण्याच्या विचारात आहे.

पाकिस्तान आयएमएफकडून ६.५ अब्ज डॉलर्सचे बेलआउट पॅकेज मागत आहे. खचत्रऋ टीम फेब्रुवारीच्या सुरुवातीला १० दिवस इस्लामाबादमध्ये राहिली, परंतु १.२ अब्जची रक्कम न देता परतली.

पाकिस्तानच्या वृत्तपत्र 'द एक्सप्रेस ट्रिब्यून'शी बोलताना खचत्रऋ च्या व्यवस्थापकीय संचालक क्रिस्टालिना जॉर्जिएवा म्हणाल्या की, पाकिस्तानला योग्य प्रकारे कर गोळा करावा लागेल आणि तो कराचा पैसा ते गरिबांच्या भल्यासाठीखर्च करत आहेत हे दाखवले पाहिजे. सर्व प्रकारच्या सबसिडी बंद कराव्या लागतील.

क्रिस्टालिना जॉर्जिएवा पुढे म्हणाल्या की, हे आश्चर्यकारक आहे की २२ कोटी लोकसंख्या असलेल्या पाकिस्तानमध्ये २२% लोक दारिद्र्यरेषेखाली राहतात. देशाच्या ४९.६% उत्पन्न २०% लोकांच्या खिशात जाते. फक्त ७% पैसा २०% गरीबांपर्यंत पोहोचतो.

२२ फेब्रुवारी रोजी पाकिस्तानचे संरक्षण मंत्री ख्वाजा आसिफ यांनी एक धक्कादायक खुलासा केला होता. आसिफ म्हणाले होते की, अलीकडेच पाकिस्तानच्या एका नोकरशहाच्या मुलीचे लग्न झाले. आमच्याकडे 'सलमी' नावाचा विधी आहे. यामध्ये पालक, नातेवाईक आणि पाहुणे विवाहित जोडप्याला भेटवस्तू देतात. एकट्या वधूला ७२ कोटी रुपये (पाकिस्तानी चलन) मिळाले.

आसिफ पुढे म्हणाले की, तो फार मोठा अधिकारीही नव्हता. तुम्हाला आश्चर्य वाटेल की याच अधिकाऱ्याने गेल्या वर्षी आपल्या मोठ्या मुलीचे लग्न लावून दिले होते आणि त्यानंतर त्याच्या मुलीला सलामी समारंभात १.२० अब्ज रुपये मिळाले होते. इम्रान खान यांच्या पक्षाचे बडे नेते आणि गेल्या महिन्यापर्यंत पंजाब प्रांताचे मुख्यमंत्री असलेले परवेझ इलाहीही त्या लग्नात सहभागी झाले होते.

आसिफ सांगतात की, मी परवेजसोबत लग्नाबद्दल बोललो होतो. तो मला म्हणाला की, लग्नासाठी भेटवस्तू गोळा करणाऱ्या एका व्यक्तीला मी विचारले की आतापर्यंत किती पैसे मिळाले आहेत. तर त्याने ७२ कोटी मिळाले असून अजून मोजणी सुरू आहे, असे सांगितले.

दिवाळखोरीच्या उंबरठ्यावर उभ्या असलेल्या पाकिस्तानला चीनने एक-दोन नव्हे तर अडीच लाख कोटी रुपयांच्या कर्जाखाली दाबले आहे. अमेरिका आणि खचत्रऋ च्या नकारानंतर, शुक्रवारी चीनने आणखी ७० कोटी डॉलर्स म्हणजेच ५८ हजार कोटी रुपयांचे कर्ज दिले. वरून असे दिसत आहे की चीनने आपला मित्र पाकिस्तानला वाचवले आहे, पण तसे नाही. वास्तविक या माध्यमातून चीन पाकिस्तानला कर्जाच्या विळख्यात अडकवत आहे.